मासिक अंक
(खाजगी वितरण)

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

# महाआयटी संवाद

चौथा अंक - जून 2026





# महा सारथी

## महाराष्ट्राचा डिजिटल कणा

सर्व शासकीय सेवा व कल्याणकारी योजनांसाठी एकच केंद्र


**महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# या अंकात...

**संपादकीय** 1
लोकाभिमुख डिजिटल भविष्याची पायाभरणी

**मुख्य लेख - महासारथी** 2
लोकाभिमुख डिजिटल प्रशासनाच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल

**सविस्तर** 7
महासारथी काय आहे?

**महाआयडी** 8
एकीकृत पोर्टलद्वारे नागरिकांना शासनाशी जोडणारा दुवा

**डेटा एकत्रीकरणाद्वारे स्मार्ट प्रशासन** 9
एकीकृत नोंदी महत्त्वाच्या का आहेत

**टेक वारी 2.0 मध्ये महासारथी** 10
महासारथीतर्फे लोकाभिमुख नवोन्मेषाचा आविष्कार

**जिद्दीला मिळाले पंखाचे बळ** 12
भार नव्हे, आधार बनला अब्दुल

**डिजिटल परिवर्तक** 14
डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांचे सक्षमीकरण

**समावेशक प्रशासन** 15
आधार नोंदणी उपक्रमाने अहमदपूरमध्ये जागवली नवी आशा

**सक्षमीकरणाकडे वाटचाल** 17
विजय कोपनार: धैर्य आणि सेवेचा प्रेरणादायी प्रवास

**टेकवारी 2.0** 18
भविष्यसज्ज प्रशासनासाठी एक परिवर्तनकारी प्रशिक्षण प्रवास

**डिजिटल शासनासाठी सामुदायिक क्षमता निर्माण** 24
नाशिक येथे MahaIT–YCMOU प्रशिक्षकांचे प्रशिक्षण

**टेकमहाइम्पॅक्ट 2026** 27
तंत्रज्ञान, सामाजिक उत्तरदायित्व व सुशासनाच्या संगमाने महाराष्ट्राच्या डिजिटल भवितव्याला नवी दिशा



# संपादकीय


## भगवान पाटील

मुख्य परिचालन अधिकारी, महाआयटी


## लोकाभिमुख डिजिटल भविष्याची पायाभरणी

महाराष्ट्रासह देशभरात शासन व्यवस्थेचे स्वरूप झपाट्याने बदलते आहे. एकेकाळी कागदपत्रे, शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या आणि विविध विभागांतील गुंतागुंतीच्या प्रक्रियांमध्ये अडकलेली सेवा-वितरण व्यवस्था आज तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक सुलभ, सुसंगत आणि लोकाभिमुख होते आहे. सेवांचे हे डिजिटायझेशन म्हणजे शासन नागरिकांपर्यंत कसे पोहोचते आणि त्यांना कशा पद्धतीने सेवा प्रदान करते, याच्या स्थित्यंतराचे निदर्शक आहे.

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नागरिकांचे जीवन जास्त सोपे आणि सक्षम होते, तेव्हा तंत्रज्ञानाचा योग्य वापर होत असल्याची खात्री पटते, हे या अंकातील विविध लेख आणि यशोगाथांवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य सहज उपलब्ध करून, शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर लाभ पोहोचवून, समाजातील वंचित घटकांपर्यंत कल्याणकारी योजनांचा लाभ पोहोचेल याची खातरजमा करून, तसेच दुर्गम भागांमध्ये अत्यावश्यक सेवा उपलब्ध करून, डिजिटल प्रशासन व्यवस्था आज सर्वसामान्य नागरिकांसाठी समावेशक विकास आणि नव्या संधींची दालने उघडते आहे.

पारंपरिक सेवा वितरण प्रणालीपासून एकात्मिक प्रशासन व्यवस्थेकडे होत असलेली वाटचाल, हे सार्वजनिक प्रशासनातील सर्वात महत्त्वपूर्ण परिवर्तन होय. विविध विभागांमधील समन्वय, माहितीची सुसंगत देवाणघेवाण आणि प्रक्रियांमधील पुनरावृत्ती कमी केल्यामुळे सेवा जास्त जलद, पारदर्शक आणि विश्वासार्ह होत आहेत. नागरिकांनी एका सेवेसाठी अनेक कार्यालयांमध्ये फेऱ्या माराव्यात किंवा तीच माहिती आणि कागदपत्रे वारंवार सादर करावी, ही परिस्थिती आता बदलते आहे. भविष्यातील प्रशासन हे नागरिकांना अखंड, कार्यक्षम आणि सहज सेवा प्रदान करणारे असेल, अशी ग्वाही देणारे हे आशादायक चित्र आहे.

विश्वसनीय यंत्रणा या आधुनिक प्रशासनाची पायाभरणी करत आहे. नागरिकांना शासनाकडून पारदर्शकता, जबाबदारी आणि प्रभावी संवादाची अपेक्षा असते. डिजिटल मंच, वास्तविक निरीक्षण प्रणाली आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रिमुळे शासन अधिक जबाबदार आणि परिणामकारक होते आहे. अर्जांचा पाठपुरावा करण्याची सुविधा, आवश्यक तपशिलांची सहज उपलब्धता आणि सेवांचा वेळेत लाभ मिळणे यामुळे नागरिकांचा शासनावरील विश्वास अधिक दृढ होतो आहे.

मुख्य म्हणजे नागरिकांच्या कल्याणासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत असताना, कोणताही नागरिक विकास प्रक्रियेपासून वंचित राहू नये, याचे भान राखले जाते आहे. शहरी आणि ग्रामीण भाग, आदिवासी पाडे तसेच विविध कारणांमुळे मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या समुदायांना डिजिटल प्रशासनाच्या या प्रवाहात सामावून घेतले जाते आहे. भौगोलिक मर्यादा, वय, अपंगत्व किंवा आर्थिक अडचणी अशा अडथळ्यांवर मात करून नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविणारे उपक्रम प्रभावी ठरत असल्याचे दिसते आहे.

राज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रगत विश्लेषण प्रणाली आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना शासनाने नागरिकांना केंद्रस्थानी ठेवले आहे. नवोपक्रम हा केवळ तांत्रिक प्रगतीसाठी नसून नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, संधींचा विस्तार करण्यासाठी आणि सार्वजनिक विश्वास अधिक बळकट करण्यासाठी पूरक असावा, ही खबरदारी शासन घेते आहे.

भविष्यातील प्रवास आव्हानात्मक असला तरी तो आशादायी सुद्धा आहे. तंत्रज्ञानाला संवेदनशीलतेची जोड, कार्यक्षमतेला जबाबदारीची साथ आणि नवोपक्रमाला सर्वसमावेशकतेची दिशा दिल्यास आपण केवळ डिजिटल नव्हे, तर खऱ्या अर्थाने लोकाभिमुख शासनव्यवस्था उभारू शकतो, हा विश्वास प्रशासनाने दिला आहे. हा विश्वासच महाराष्ट्राच्या सक्षम आणि उज्ज्वल भवितव्याला आकार देईल, यात शंकाच नाही.



# मुख्य लेख - महासारथी


## अनुप आर. बाणाईत

राज्य व्यवस्थापक - प्रकल्प, महाआयटी


## लोकाभिमुख डिजिटल प्रशासनाच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल

गडचिरोलीमधली दुर्गम आदिवासी गावे असो, विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतजमिनी असो, मुंबईतल्या गजबजलेल्या शहरी वस्त्या असो किंवा नंदुरबारमधला डोंगराळ भाग असो, राज्याच्या विविध जिल्ह्यांमधील नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी सादर करावी लागणारी असंख्य कागदपत्रे, वारंवार पडताळणी, वेगवेगळी पोर्टल्स आणि प्रशासकीय विलंब अशा समस्यांना वर्षानुवर्षे सामोरे जावे लागत होते.

गेली अनेक वर्षे राज्यातील नागरिकांना शिष्यवृत्ती, निवृत्तीवेतन, शेतकरी अनुदान, आरोग्य लाभ किंवा रोजगार योजनांचा लाभ घेण्यासाठी एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात कागदपत्रे घेऊन फेऱ्या माराव्या लागत होत्या आणि वेगवेगळ्या विभागांमध्ये अनेकदा तीच कागदपत्रे पुन्हा पुन्हा सादर करावी लागत होती.

- विद्यार्थी आपले जात प्रमाणपत्र अनेक वेळा अपलोड करत होते.
- शेतकरी वारंवार जमिनीच्या मालकीची कागदपत्रे सादर करत होते.
- केवळ आपली ओळख पटवण्यासाठी महिलांना दूरवर प्रवास करावा लागत होते.

शासकीय सेवा आणि योजनांचे लाभ प्राप्त करण्याची ही प्रक्रिया त्रासरहित आणि सुलभ व्हावी, हे महासारथी या महाराष्ट्राच्या महत्त्वाकांक्षी डिजिटल प्रशासन प्रकल्पाचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

महासारथी हे केवळ एक पोर्टल नाही. "एक नागरिक, एक डिजिटल ओळख, एक शासकीय अनुभव" या दृष्टीकोनावर आधारित हा उपक्रम प्रशासनातील परिवर्तनात्मक बदलाचे प्रतिनिधित्व करणारा आहे. राज्यातील सर्व नागरिकांसाठी एक अखंड, एकीकृत आणि बुद्धिमान डिजिटल परिसंस्था निर्माण करून, नागरिक आणि शासन यांच्यातील सुसंवाद नव्याने परिभाषित करण्याच्या उद्देशाने हा मंच तयार करण्यात आला आहे. महाआयडी-आधारित सिंगल साइन-ऑन'द्वारे समर्थित, महासारथी हा उपक्रम नागरिकांना एकाच प्रमाणित ओळखीच्या आधारे अनेक शासकीय सेवा उपलब्ध करून देतो, ज्यामुळे विविध शासकीय योजनांसाठी वारंवार नोंदणी करण्याची आणि कागदपत्रे सादर करण्याची गरज संपुष्टात येते.



विविध शासकीय विभागांच्या समन्वयाने राज्यातील नागरिकांच्या सत्यापित नोंदी या मंचावर उपलब्ध होतात, ज्यामुळे जलद आणि अधिक कार्यक्षम सेवा वितरण शक्य होते. एकीकृत डिजिटल आराखड्यांतर्गत विभागांना एकत्रित करून, महासारथीची यंत्रणा विविध संस्थांमध्ये वास्तविक समन्वय आणि डेटाची देवाणघेवाण सुलभ करते, ज्यामुळे कामाची पुनरावृत्ती आणि प्रशासकीय विलंब कमी होतो. स्वयंचलित पात्रता पडताळणीच्या सुविधेमुळे नागरिकांना कोणत्याही क्लिष्ट प्रक्रियेशिवाय, ते कोणत्या योजना आणि सेवांसाठी पात्र आहेत, हे त्वरित कळू शकते.

प्रमाणित नोंदी स्वयंचलितपणे प्राप्त होत असल्यामुळे नागरिकांना कागदपत्रे वारंवार अपलोड करण्याची गरज भासत नाही. अशा प्रकारे नागरिकांच्या प्रमाणित नोंदी सर्व विभागांना उपलब्ध होत असल्यामुळे सेवा वितरणात लक्षणीय सुधारणा होते, कामकाजातील पारदर्शकता वाढीला लागते. सेवा सहज उपलब्ध होत असल्यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढतो आणि महाराष्ट्राची लोकाभिमुख डिजिटल भविष्याच्या दिशेने वाटचाल सुरळीत होते. शहरी भागांबरोबरच ग्रामीण आणि दुर्गम भागांमधील नागरिकांची उपजीविका, शिक्षण, आरोग्यसेवा आणि संधींवर याचा सर्वात मोठा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

### वारंवार नोंदणीपासून सुटका

महाआयडी-आधारित सिंगल साइन-ऑन हे महासारथीचे सर्वात

महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

आतापर्यंत नागरिकांना खाली नमूद शासकीय पोर्टल्ससाठी स्वतंत्र लॉगिनची आवश्यकता भासत असे:

- शिष्यवृत्ती पोर्टल्स
- कृषी पोर्टल्स
- रोजगार केंद्रे
- कल्याण विभाग
- कौशल्य विकास मंच

यामुळे नागरिकांच्या, विशेषतः नव्या डिजिटल वापरकर्त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होत असे.

महाआयडीमुळे नागरिकांना अनेक शासकीय सेवांसाठी एकच डिजिटल ओळख वापरता येते आहे.

शासकीय सहाय्य मिळेल, याची खात्री वाटत नसल्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड या दुर्गम भागातील कोसेम पुंगाटी या आदिवासी विद्यार्थिनीला परिचारिका होण्याचे आपले स्वप्न एकेकाळी अप्राप्य वाटत होते. हंगामी शेती आणि वन उत्पादनांवर तिच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असे, त्यामुळे अर्ज भरण्यासाठी, इंटरनेट सुविधेसाठी तिला जवळच्या शहरापर्यंत दूरवर प्रवास करावा लागत असे. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याकरिता सायबर कॅफेला वारंवार भेट देणे, विविध विभागांच्या पोर्टलवर स्वतंत्र नोंदणी करणे, तीच कागदपत्रे पुन्हा पुन्हा अपलोड करणे आणि त्यासाठी वेगवेगळे पासवर्ड लक्षात ठेवणे ही आणखी काही आव्हाने होती. ही प्रक्रिया वेळखाऊ होती, आणि आर्थिक परिस्थिती बिकट असणाऱ्या कुटुंबांसाठी त्रासदायक सुद्धा होती.

आता मात्र महासारथीच्या महाआयडी-सक्षम सिंगल साइन-ऑन प्रणालीमुळे कोसेमच्या अडचणी दूर झाल्या आहेत. महासारथी मंचावरील सत्यापित डिजिटल ओळखीमुळे आता तिला अनेक शैक्षणिक आणि कल्याणकारी सेवांचा लाभ अखंडपणे घेता येतो. तिच्या प्रोफाइलमधील माहिती आणि प्रमाणित नोंदी विविध विभाग आणि ॲप्लिकेशन्समध्ये सुरक्षितपणे पुन्हा वापरणे शक्य झाले आहे. अर्ज करण्यासाठी वारंवार कार्यालयांना भेट देणे, कागदपत्रे सादर करणे अशी कामे आता करावी लागत नाहीत. एका सोप्या, जलद आणि जास्त नागरिक-स्नेही डिजिटल प्रक्रियेद्वारे ही कामे पूर्ण केली जाऊ शकतात. त्यामुळे महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागांमधील विद्यार्थ्यांसाठी जास्त संधी उपलब्ध होतात.
दुर्गम जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी, ही सुलभताच सक्षमीकरण करणारी ठरते आहे.

## नागरिकांच्या नोंदी

नागरिकांच्या विश्वासार्ह नोंदी हा महासारथीचा गाभा आहे. शासकीय योजनांचे लाभ नागरिकांना प्रदान करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या नागरिकांच्या सत्यापित नोंदी उपलब्ध असणारी ही विश्वसनीय यंत्रणा आहे. नागरिकांकडून वारंवार तीच माहिती गोळा करण्याऐवजी, शासकीय विभाग अशा प्रमाणित स्रोताचा वापर करू शकतात. विश्वासार्ह डिजिटल प्रशासनाचा भक्कम पाया तयार करणारा हा उपक्रम आहे.

नंदुरबार या आदिवासी-बहुल जिल्ह्यातील अक्कलकुवा येथील लक्ष्मीबाई शिंदे या विधवा महिला, आपला घरगुती खर्च आणि दैनंदिन गरजा भागवण्यासाठी शासकीय निवृत्तीवेतनावर अवलंबून आहेत. हे निवृत्तीवेतन प्राप्त करण्यासाठी एक क्लिष्ट प्रक्रिया त्यांना पूर्ण करावी लागत असे. त्यात अर्ज भरण्याबरोबरच उत्पन्नाचे दाखले, रहिवासी पुरावा, ओळख पडताळणीची कागदपत्रे आणि बँकेशी संबंधित कागदपत्रे सादर करावी लागत. ही कागदपत्रे मिळवण्यासाठी आणि सादर करण्यासाठी अनेकदा शासकीय कार्यालये किंवा सेवा केंद्रांपर्यंत लांबचा प्रवास करावा लागत असे. दुर्गम भागात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी हे दिव्यच होते.

महासारथी मंचाने हा अनुभव अगदीच सोपा केला आहे. या मंचावर नागरिकांच्या सत्यापित नोंदी विविध विभागांमध्ये सुरक्षितपणे पुन्हा वापरता येतात आणि परस्पर संलग्न शासकीय प्रणालींद्वारे प्रमाणित माहिती डिजिटल स्वरूपात प्राप्त करता येते. यामुळे वारंवार कागदपत्रे सादर करण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली, कार्यालयांना प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता कमी झाली, पेन्शन मंजुरी जलद गतीने मिळू लागली, परिणामी लक्ष्मीबाईंसारख्या लाभार्थ्यांचा त्रास खूपच कमी झाला. आर्थिक मदत तसेच अत्यावश्यक शासकीय सेवा मिळवण्यात मोठा अडथळा ठरणारी गुंतागुंत कमी करून, हा उपक्रम, ज्येष्ठ आणि दुर्बल नागरिकांना त्यांचा आत्मसन्मान पुन्हा मिळवून देण्यास हातभार लावतो आहे.

## संलग्न विभाग

विविध शासकीय विभागांमध्ये संलग्नतेचा आणि समन्वयाचा अभाव, हे भारतीय प्रशासन व्यवस्थेसमोरचे एक मोठे आव्हान आहे. शिक्षण व्यवस्था आणि महसूल विभागाचे काम परस्परांपासून अलिप्त दिसते. कल्याणकारी लाभांच्या नोंदी रोजगार प्रणालीपासून विलग राहतात. नागरिकच एका विभागातून दुसऱ्या विभागांमध्ये कागदपत्रे वाहून नेणारा दुवा म्हणून काम करत राहतात. अशा सर्व शासकीय विभागांना डिजिटल पद्धतीने जोडून एक आंतरकार्यक्षम परिसंस्था तयार करणे, हे महासारथीचे उद्दिष्ट आहे.

रमेश खांडेकर हे यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडाजवळच्या एका गावातले कापूस उत्पादक शेतकरी. उत्पादकता वाढवणारी आणि शेतीचा खर्च कमी करणारी कृषी उपकरणे खरेदी करण्यासाठी ते शासकीय अनुदानावर अवलंबून आहेत. आतापर्यंत अशा मदतीसाठी अर्ज करणे ही वेळखाऊ प्रक्रिया होती, ज्यामध्ये त्यांना जमिनीच्या मालकीची कागदपत्रे, आधार तपशील, बँकेची माहिती, रहिवासी पुरावा आणि महसूल नोंदी असे अनेक तपशील विविध कार्यालयांमध्ये स्वतः जाऊन सादर करावे लागत होते. अर्जांची पडताळणी आणि मंजुरीसाठी अनेकदा काही आठवडे लागत, ज्यामुळे शेतीच्या हंगामात अत्यंत निकडीची मदत विलंबाने मिळत असे.

महासारथीच्या परस्पर-संलग्न विभागीय परिसंस्थेमुळे, ही प्रक्रिया आता जास्त कार्यक्षम आणि पारदर्शक होते आहे. एकिकृत प्रणालीच्या माध्यमातून आता जमिनीच्या मालकीबाबतचा डेटा डिजिटल पद्धतीने सत्यापित केला जातो, ओळखपत्रांची सुरक्षितपणे पडताळणी केली जाते आणि बँक खात्याची जोडणीसुद्धा स्वयंचलितपणे प्रमाणित केली जाते. यामुळे अनेकदा कागदपत्रे सादर करण्याचा भार कमी होतो, अनुदान मंजुरीला गती मिळते आणि दुबार किंवा फसव्या दाव्यांची शक्यता कमी होते. अनिश्चित हवामान आणि वाढत्या उत्पादन खर्चाच्या दबावाखाली असणाऱ्या रमेशसारख्या हजारो शेतकऱ्यांना शासकीय मदत वेळेवर आणि विनाअडथळा मिळाल्यास उपजीविका टिकवून ठेवण्यात आणि कृषी स्थिती सुधारण्यात लक्षणीय बदल घडू शकतो.

## योजनेच्या पात्रतेची जलद पडताळणी

लाभार्थी पात्रतेच्या पडताळणीमधील मानवी हस्तक्षेप, हे शासकीय योजनांच्या लाभ वितरणातील विलंबाचे एक मुख्य कारण होय. प्राप्त अर्जांना जोडलेली जात प्रमाणपत्रे, उत्पन्नाचे दाखले, रहिवासी नोंदी आणि शैक्षणिक पात्रता तपासण्यात शासकीय कर्मचाऱ्यांचा बराच वेळ जात असे. महासारथी मंच मात्र प्रमाणित स्रोत प्रणालीचा वापर करतो आणि अशा दस्तावेजांची डिजिटल पडताळणी करतो, ज्यामुळे प्रक्रिया अधिक जलद, अधिक अचूक आणि अधिक पारदर्शक होते.

आपल्या कुटुंबातील पहिलाच महाविद्यालयीन विद्यार्थी असलेल्या मालेगावच्या इम्रान शेखसारख्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा बदल विशेष उपयुक्त आहे. इम्रानसारखे अनेक विद्यार्थी आपले शिक्षण सुरु ठेवण्यासाठी शुल्क परतफेड आणि कौशल्य विकास योजनांवर अवलंबून आहेत. मानवी पडताळणीच्या प्रक्रियेत अशा विद्यार्थ्यांचे शासकीय लाभांसाठीचे अर्ज अनेकदा विलंबाने मंजूर होत असत.

महासारथीच्या स्वयंचलित पात्रता पडताळणी प्रणालीअंतर्गत आता शैक्षणिक नोंदी डिजिटल पद्धतीने प्रमाणित केल्या जाऊ शकतात, उत्पन्नाच्या पात्रतेची पडताळणी केली जाऊ शकते आणि दुबार किंवा चुकीच्या नोंदी स्वयंचलितरित्या ओळखल्या जाऊ शकतात. परिणामी, शिष्यवृत्ती आणि कल्याणकारी योजनांची मंजुरी जलद होते, विद्यार्थ्यांची अनिश्चितता कमी होते आणि शैक्षणिक मदत लाभार्थ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शकपणे पोहोचते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या इम्रानसारख्या अनेक विद्यार्थ्यांसाठी वेळेवर मिळणारी आर्थिक मदत ही केवळ तरतूद नसते, ती त्यांच्या उच्च शिक्षणाची हमी असते.

## "एक-वेळ" नोंदणी आणि कागदपत्रे वारंवार सादर करण्यापासून मुक्ती

जगभरातील प्रगत डिजिटल प्रशासन प्रणाली अधिकाधिक प्रमाणात या "एक-वेळ" तत्त्वाचा अवलंब करत आहेत. हा लोकाभिमुख दृष्टिकोन आहे, ज्याअंतर्गत नागरिक आपली माहिती सरकारला फक्त एकदाच देतात. याच तत्वाचा स्वीकार करत महासारथी विविध शासकीय सेवा आणि कल्याणकारी योजनांचे लाभ प्रदान करताना नागरिकांच्या प्रमाणित नोंदींचा सुरक्षित पुनर्वापर करत आहे, आणि अनावश्यक प्रक्रियेत कपात करत आहे.

शालेय शिक्षण घेणाऱ्या दोन अपत्यांचा सांभाळ करणाऱ्या मुंबईतील घरगुती कामगार सविता जगताप यांच्यासारख्या अनेक नागरिकांसाठीही हा बदल उपयुक्त ठरतो आहे. आपल्या कुटुंबाच्या गरजा भागवण्यासाठी सविता जगताप यांना आरोग्य सहाय्य, शिधावाटप, शैक्षणिक सहाय्य आणि इतर कल्याणकारी लाभांसाठी अर्ज करावे लागतात. आतापर्यंत अशा प्रत्येक अर्जासाठी आधारच्या प्रती, पत्त्याचा पुरावा, उत्पन्नाचे प्रमाणपत्र आणि बँक नोंदी वारंवार सादर कराव्या लागत होत्या. त्यासाठी त्यांना अनेक वेळा सायबर कॅफेत जावे लागत असे, तसेच कागदपत्रे अपलोड करण्यासाठी आणि सेवा शुल्क भरण्यासाठी पैसे खर्च करावे लागत होते.

आता मात्र महासारथीच्या मंचावरुन अशा अर्जांमध्ये सत्यापित नोंदी आपोआप भरल्या जाऊ शकतात, ज्यामुळे अर्ज भरणे तुलनेने सोपे होते आणि कागदपत्रे वारंवार सादर करण्याच्या त्रासातूनही सुटका होते.

प्रत्येक सेवेसाठी केलेल्या प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्रपणे शुल्क भरावे लागत नाही, सायबर कॅफेवरील अवलंबित्व कमी होते, आणि मर्यादित वेळ, स्रोत उपलब्ध असणाऱ्या, अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी कल्याणकारी सेवा मिळवणे सुलभ होते. अशा प्रकारे डिजिटल प्रशासन जास्त समावेशक, सुलभ आणि कष्टकरी कुटुंबांच्या सोयीचे असेल, याची खातरजमा हा मंच करतो आहे.

## स्रोत प्रणालींमधून प्रमाणित माहिती स्वयंचलितपणे प्राप्त

नागरिकांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रतींवर अवलंबून राहण्याऐवजी, थेट प्रमाणित स्रोत प्रणालींमधून सत्यापित डेटा स्वयंचलितपणे मिळवण्याची क्षमता, हे महासारथीचे सर्वात महत्वाचे शक्तीस्थळ होय. यामुळे सार्वजनिक सेवा वितरणाचा वेग, विश्वसनीयता आणि कार्यक्षमतेमध्ये लक्षणीय सुधारणा होते, तसेच डिजिटल शासन यंत्रणेवरील विश्वास दृढ होतो.

शासकीय तंत्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेऊन, कौशल्ये प्राप्त करु इच्छिणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील प्रवीण पवार यांच्यासारख्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरतो आहे. प्रवीण पवार यांना शैक्षणिक किंवा कौशल्य-आधारित योजनांसाठी अर्ज करताना प्रत्येक वेळी गुणपत्रिका, ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र आणि उत्पन्नाचा पुरावा वारंवार अपलोड करावा लागत असे.

कनेक्टिव्हिटीच्या मर्यादा आणि कागदपत्रांच्या वारंवार पडताळणीमुळे ही प्रक्रिया वेळखाऊ ठरत असे. महासारथीच्या एकीकृत डिजिटल प्रणालीअंतर्गत शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी

डिजिटल पद्धतीने केली जाते, संलग्न डेटाबेसद्वारे नोंदी प्रमाणित केल्या जातात आणि विश्वसनीय शासकीय प्रणालीच्या माध्यमातून पात्रतेची पडताळणी स्वयंचलितपणे होते.

यामुळे कौशल्य विकास कार्यक्रमांमधील सहभागाचे प्रमाण वाढते आहे, दस्तावेज फसवणुकीची शक्यता कमी झाली आहे आणि नवनवीन क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या ग्रामीण भागातील युवा वर्गासाठी या संधींपर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे. महाराष्ट्र आपली डिजिटल अर्थव्यवस्था आणि भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ प्रणालीचा विस्तार करत असताना, राज्यभरातील युवा नागरिकांना संधींची सर्वसमावेशक आणि विश्वासार्ह उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी अशा बुद्धिमान प्रशासकीय क्षमता आजघडीला महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

## एकीकृत प्रशासनाचा अनुभव

वेगवेगळ्या सेवांसाठी एकापेक्षा जास्त विभागांच्या संकेतस्थळांना भेट देण्याऐवजी एकाच पोर्टलवर सर्व शासकीय सेवांची उपलब्धता हा अनुभव नागरिकांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. सोप्या, डिजिटल स्वरूपामुळे शहरांबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांसाठीसुद्धा हे सुलभीकरण सोयीचे ठरेल. प्रशासकीय भार कमी होईल, तसेच कल्याणकारी आणि विकास योजना अधिक सुलभपणे उपलब्ध होतील. मेळघाटामध्ये दुर्गम आदिवासी भागात स्वयं-सहायता गटाच्या माध्यमातून अन्न प्रक्रिया एकक चालवणाऱ्या धवली किरसन अत्राम यांच्यासारख्या उद्योजकांसाठी सुद्धा हा उपक्रम अधिक अर्थपूर्ण आहे. या उद्योजकांना आपला उद्योग वाढवण्यासाठी एमएसएमई नोंदणी करण्यासाठी, उद्योजकता प्रशिक्षण तसेच आर्थिक सहाय्य प्राप्त करण्यासाठी विविध विभागीय पोर्टल्सवर अर्ज भरावे लागणार नाहीत, वारंवार दस्तावेज सादर करावे लागणार नाहीत, तसेच गुंतागुंतीच्या प्रशासकीय प्रक्रिया स्वतंत्रपणे हाताळाव्या लागणार नाहीत.

महासारथीच्या एकीकृत शासन प्रणालीच्या माध्यमातून शासकीय सेवा परस्परांशी जोडल्या जाऊ शकतात, अर्जांवर सुलभरित्या प्रक्रिया होऊ शकते. आणि सत्यापित माहितीचा विविध विभागांमध्ये सुरक्षितपणे पुनर्वापर केला जाऊ शकतो, ज्यामुळे नागरिकांसाठी सेवांचा लाभ प्राप्त करणे सोयीचे होते. केवळ उद्योजक किंवा प्रशासनाला याचा लाभ मिळत नाही, तर ग्रामीण भागातील महिला उद्योजकांचा औपचारिक आर्थिक प्रणालींमध्ये समावेश होण्याचा मार्गही प्रशस्त होतो.

दुर्गम भागांमध्ये अनेकदा महिला-प्रणित उद्योगांच्या संदर्भात निधीच्या कमतरतेपेक्षा गुंतागुंतीच्या प्रक्रिया हा मोठा अडथळा ठरतो. अशा प्रकरणी, एकात्मिक डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून असे अडथळे दूर करण्याची क्षमता महासारथीमध्ये आहे.

## प्रशासकीय लाभ

महासारथी हा मंच नागरिक-केंद्रित असला तरी तो राज्यासाठी सुद्धा मोठे प्रशासकीय लाभ प्रदान करतो.

**प्रशासकीय लाभ**

- बनावट लाभार्थ्यांची संख्या कमी होते
- योजनांना जलद मंजुरी मिळते
- डेटाची अचूकता सुधारते
- प्रशासकीय खर्च कमी होतो
- मानवी पडताळणीच्या कामाचा भार कमी होतो
- विविध विभागांमध्ये उत्तम समन्वय साधला जातो

**धोरणात्मक लाभ**

या मंचावरील संलग्न प्रणाली खालील मुद्द्यांबाबत प्रशासनाला मदत करू शकतात:

- वंचित नागरिक ओळखणे
- कल्याणकारी योजनांचा लक्षित गट निश्चित करणे
- योजनांच्या परिणामांवर देखरेख
- पुराव्यावर आधारित धोरणनिर्मितीला बळ

हा उपक्रम बुद्धिमान प्रशासनाची पायाभरणी करणारा आहे.

## डिजिटल प्रशासनाचे परिवर्तन

महासारथी हा मंच डिजिटल प्रशासकीय परिवर्तनाच्या प्रगत टप्प्याचे प्रतिनिधित्व करतो. याद्वारे खाली नमूद बाबी साध्य करणे शक्य आहे:

- नागरिकांसाठी एआय-सहाय्यित मदत यंत्रणा
- भविष्यकालीन परिस्थितीसाठी उपयुक्त कल्याणकारी योजनांची निर्मिती
- वास्तविक तक्रार निवारण
- वैयक्तिकृत नागरिक डॅशबोर्ड
- कागदरहित प्रशासन
- धोरणनिर्मितीसाठी उपयुक्त विश्लेषण

'अर्जांचे डिजिटायझेशन' करण्यापासून 'प्रशासनाचे डिजिटायझेशन' करण्याकडे झालेले स्थित्यंतर यावरून दिसून येते.

## डिजिटल प्रशासनासाठी महाराष्ट्राचा दृष्टीकोन

भारत जागतिक दर्जाच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देत असताना, महाराष्ट्राचा महासारथी हा मंच खऱ्या अर्थाने पारदर्शक आणि नागरिक-केंद्रित शासनाच्या संकल्पनेवर आधारित एक धाडसी आणि भविष्यवेधी प्रशासकीय दृष्टीकोन प्रतिबिंबित करतो. हा उपक्रम प्रशासकीय गुंतागुंत कमी करून आणि सार्वजनिक सेवा अधिक सुलभ करून, विशेषतः दुर्गम आणि वंचित भागांतील नागरिकांना सुलभ प्रशासनाचा अनुभव प्रदान करतो.

राज्यातील विद्यार्थी, महिला, शेतकरी, कष्टकरी कुटुंबांतील नागरिक तसेच महिला उद्योजकांसह सर्व पात्र लाभार्थींना शासकीय सेवा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या दैनंदिन अडचणी आणि अडथळे लक्षणीयरीत्या कमी करण्याची क्षमता 'महासारथी'मध्ये आहे.

हा प्रकल्प म्हणजे, एक सर्वसमावेशक, कार्यक्षम आणि विस्तारक्षम अशी एकात्मिक प्रशासन व्यवस्था उभारून, महाराष्ट्राला भारतातील 'डिजिटलदृष्ट्या सक्षम' राज्यांच्या अग्रस्थानी पोहोचवण्याच्या दिशेने टाकलेले निर्णायक पाऊल आहे.

'महासारथी' हा आजच्या डिजिटल युगात नागरिक आणि शासन यांच्यातील संबंध दृढ करणारा एक महत्त्वाकांक्षी प्रयत्न आहे. 'महा-आयडी' आधारित 'सिंगल साइन-ऑन' सुविधा, सुलभ नागरिक नोंदणी, विविध शासकीय विभागांमधील समन्वय, पात्रतेची स्वयंचलित पडताळणी, अधिकृत माहितीची देवाणघेवाण आणि दस्तावेज सादर करण्याच्या प्रमाणातील घट अशी वैशिष्ट्ये असणारी ही यंत्रणा अशा एका व्यवस्थेची पायाभरणी करत आहे, जी जास्त वेगवान असेल, आणि पूर्णपणे नागरिक-केंद्रित असेल.

या पोर्टलवरील 'लॉग-इन्स' ची आकडेवारी किंवा डिजिटल व्यवहारांच्या संख्येवरून 'महासारथी'चे खरे यश मोजता येणार नाही. नागरिकांच्या जगण्यातील सुलभता वाढीस लागेल आणि त्यांच्यासाठी प्रगतीची नवी कवाडे उघडू लागतील, तेव्हाच हा उपक्रम यशस्वी होतो आहे, असे म्हणता येईल. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची मदत वेळेवर मिळावी, शेतकऱ्याच्या बँक खात्यात शासकीय अनुदान विनासायास जमा व्हावे, महिलांना लाभाची रक्कम प्राप्त होण्याची वाट बघावी लागू नये, आणि उद्योग-सुलभतेच्या दृष्टीने उपयुक्त प्रक्रियांमुळे जास्तीत जास्त उद्योजक महाराष्ट्राकडे आकृष्ट व्हावेत, हे आधुनिक महाराष्ट्राचे चित्र प्रत्यक्षात साकार करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, आणि 'महासारथी'च्या माध्यमातून, हे ध्येय साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.



# सविस्तर

## महासारथी काय आहे?

महासारथी हा लोकाभिमुख सार्वजनिक सेवा परिसंस्था निर्माण करणारा महाराष्ट्र शासनाचा एकीकृत डिजिटल प्रशासन मंच आहे. शिष्यवृत्ती, कल्याणकारी योजना, अनुदान, प्रमाणपत्रे किंवा शासकीय मंजुरीसाठी नागरिकांना विविध पोर्टल्सना भेट द्यावी लागते. त्याऐवजी एकाच मंचावर, आणि एका सुरक्षित डिजिटल ओळख क्रमांकाचा वापर करून नागरिकांना सर्व शासकीय लाभ डिजिटल पद्धतीने प्रदान करण्याचे, या मंचाचे उद्दिष्ट आहे. 'एक राज्य, एक पोर्टल' या महाराष्ट्राच्या व्यापक संकल्पनेला समर्थन देणारा हा उपक्रम असून, त्याद्वारे अधिक जलद, कागदरहित, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासन साध्य करणे अपेक्षित आहे.

विभाग, नागरिक नोंदी आणि डिजिटल पडताळणी प्रणाली यांचा समन्वय साधत महासारथी वारंवार सादर कराव्या लागणाऱ्या कागदपत्रांची आवश्यकता कमी करते, तसेच नागरिक आणि शासकीय विभागांमधला संवाद सुलभ करते. या मंचामुळे शासकीय सेवांचे वितरण सुधारेल, प्रशासकीय विलंब कमी होईल आणि डिजिटल प्रशासन प्रणालींवरील विश्वास दृढ होईल, अशी अपेक्षा आहे.

## महाआयडी काय आहे?

महाआयडी हा महासारथी मंचावरून प्रत्येक नागरिकाला प्राप्त होणारा एक विशिष्ट ओळख क्रमांक आहे. 'सिंगल साइन-ऑन' पद्धतीने या क्रमांकाचा वापर करून नागरिकांना एकाच प्रमाणित लॉगिनच्या माध्यमातून विविध शासकीय सेवांचा लाभ घेत येतो. वेगवेगळ्या विभागांसाठी स्वतंत्र युजरनेम आणि पासवर्ड तयार करण्याऐवजी, नागरिक विविध संलग्न शासकीय पोर्टल्सवर आपली एकच डिजिटल ओळख वापरू शकतात.

महाआयडी खालील बाबींना साहाय्य करतो:

- नागरिकांचे सुरक्षित प्रमाणीकरण
- सेवांचा जलद लाभ
- कल्याणकारी योजनांची एकात्मिक अंमलबजावणी
- कागदरहित कामकाजाला हातभार
- प्रमाणीकृत पडताळणी प्रणालीच्या माध्यमातून फसवणुकीला प्रतिबंध

महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला शासकीय सेवा अधिक सुलभ, जलद आणि सहजपणे उपलब्ध करून देणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

## वारंवार दस्तावेज सादर करावे लागणे, ही समस्या का आहे?

गेली अनेक वर्षे नागरिकांना विविध योजना आणि शासकीय लाभ प्राप्त करण्यासाठी आधार, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, जमिनीचे अभिलेख, अधिवासाचा पुरावा, बँकेचे तपशील अशी कागदपत्रे आणि तपशील वारंवार सादर करावे लागत आहेत. यामुळे खालील समस्या निर्माण होतात:

- मंजुरी मिळण्यास विलंब
- कार्यालयांना फेऱ्या माराव्या लागणे
- नागरिकांना अर्ज प्रक्रियेत होणारा खर्च
- वारंवार पडताळणीच्या कामाचे अधिकाऱ्यांवर वाढणारे ओझे
- चुका किंवा फसवणुकीची वाढलेली शक्यता

सर्वसामान्य नागरिकांसाठी, विशेषत: ग्रामीण रहिवासी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी, वारंवार दस्तावेज सादर करणे हा शासकीय सेवा प्राप्त करण्यातील मोठा अडथळा ठरत होते. महासारथी आपल्या संलग्न डिजिटल प्रणाली आणि प्रमाणित डेटा-शेअरिंगच्या माध्यमातून या समस्येचे निराकरण करण्यास समर्थ आहे.

## सुवर्ण नोंदी माहितीची पुनरावृत्ती कशी टाळतात?

"सुवर्ण नोंदी" म्हणजे एकीकृत प्रशासकीय चौकटीतील नागरिकांच्या तपशिलांची एकमेव विश्वसनीय आणि सत्यापित प्रत. अनेक विभागांनी दुबार किंवा विसंगत नोंदी ठेवण्याऐवजी, महासारथी अशा प्रमाणित मूळ नोंदी तयार करू इच्छिते, ज्या विविध शासकीय सेवा प्राप्त करण्यासाठी वारंवार वापरल्या जाऊ शकतील.

यामुळे शासकीय विभागांना खालील बाबींमध्ये मदत होते:

- लाभार्थ्यांच्या दुबार नोंदी टाळणे
- माहितीच्या अचूकतेत सुधारणा
- फसवणुकीच्या दाव्यांच्या प्रमाणात घट
- मंजुरी प्रक्रियेला गती
- विभागांमधील समन्वयात सुधारणा

या सुवर्ण नोंदी अशा विश्वासार्ह डिजिटल प्रशासनाचा पाया तयार करतात, जिथे नागरिकांना वेगवेगळ्या विभागांना तीच माहिती वारंवार देण्याची गरज भासत नाही.

# महाआयडी



## एकीकृत पोर्टलद्वारे नागरिकांना शासनाशी जोडणारा दुवा

"एक राज्य, एक पोर्टल" या संकल्पनेसह आपले महाराष्ट्र राज्य डिजिटल प्रशासनाच्या नव्या युगाकडे वेगाने वाटचाल करते आहे. नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ सुलभरित्या घेता यावा, या उद्देशाने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. वेगवेगळ्या विभागांच्या संकेतस्थळांना भेट देण्याऐवजी, प्रत्येक सेवेसाठी स्वतंत्र नोंदणी करण्याऐवजी आणि त्यासाठी वेगवेगळ्या पडताळणी प्रणालींचा वापर करण्याऐवजी महासारथी या एकाच मंचावर महाआयडीचा वापर करून नागरिक कालांतराने एकाच एकीकृत डिजिटल परिसंस्थेच्या माध्यमातून सर्व शासकीय सेवांचा लाभ घेऊ शकतील. हा उपक्रम महाराष्ट्रासाठी पारदर्शक, सक्षम आणि लोकाभिमुख सेवा प्रणाली उभारण्याच्या व्यापक ध्येयाचे प्रतिबिंब आहे."

महाआयडी हा विशेष ओळख क्रमांक या उपक्रमाच्या केंद्रस्थानी आहे. आतापर्यंत शिष्यवृत्ती, कल्याणकारी लाभ किंवा प्रमाणपत्रांसाठी अर्ज करणाऱ्या नागरिकांना तीच कागदपत्रे अनेक पोर्टल्स आणि विभागांसमोर वारंवार सादर करावी लागत होती. वेगवेगळी युजरनेम, पासवर्ड आणि पडताळणी प्रणालींमुळे अनेकदा प्रत्यक्ष लाभ मिळण्यास विलंब होत असे. महाआयडी नागरिकांना एकच डिजिटल ओळख देऊन, हा विलंब कमी करण्याचा प्रयत्न करतो.

महाआयडी सारख्या एकीकृत डिजिटल ओळख क्रमांकाचा वापर उपयुक्त आणि परिवर्तनकारी ठरू शकतो. प्रमाणित डिजिटल नोंदींच्या माध्यमातून नागरिकांच्या पात्रतेची पडताळणी करून महाआयडीद्वारे नागरिकांच्या अर्जांवर जलद आणि अधिक अचूक निर्णय घेणे सोयीचे होते. या यंत्रणेद्वारे नागरिक प्रमाणीकरणाची एक विश्वासार्ह चौकट प्राप्त होते, त्याचबरोबर कागदपत्रे वारंवार सादर करण्याची आवश्यकता उरत नाही, आणि सेवा प्राप्त करणे सोपे होते. पडताळणी यंत्रणेच्या माध्यमातून दुहेरी किंवा बनावट नोंदी कमी करून ही प्रणाली फसवणुकीच्या प्रकारांनाही आळा घालण्यास सक्षम आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही प्रणाली एकाच लॉगिन आणि एकीकृत डिजिटल प्रोफाइलद्वारे अनेक शासकीय लाभांचे द्वार नागरिकांसाठी खुले करते.

हा महाआयडी दोन सोप्या टप्प्यांमध्ये प्राप्त करता येतो.
महाआयडी प्राप्त करण्याची प्रक्रिया सोपी आणि वापरकर्ता-अनुकूल आहे:
टप्पा 1: अधिकृत महासारथी पोर्टलला भेट द्या
तुमचा मोबाईल क्रमांक आणि मूलभूत तपशील वापरून नोंदणी करा.
टप्पा 2: तुमचा महाआयडी सक्रिय करण्यासाठी ओटीपी-आधारित प्रमाणीकरण आणि प्रोफाइल पडताळणी पूर्ण करा, ज्याचा उपयोग नंतर एकाच सुरक्षित लॉगिनद्वारे, उपलब्ध शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी केला जाऊ शकतो.

"कागदरहित" प्रशासनाकडे होणारी वाटचाल हा या प्रक्रियेचा आणखी एक मोठा लाभ होय. एकात्मिक डिजिटल प्रणाली आणि ई-ऑफिस मंचाच्या माध्यमातून राज्य शासनाने प्रत्यक्ष नस्ती, छायाप्रती, हाताने सह्या करणे तसेच वारंवार कागदपत्रे सादर करण्यावरील अवलंबित्व कमी करण्यावर भर दिला आहे. महासारथीच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रमाणित नोंदी विविध विभाग सुरक्षितपणे वापरू शकतात, ज्यामुळे नागरिकांकडून वारंवार माहिती गोळा करण्याऐवजी तपशिलांची डिजिटल देवाणघेवाण शक्य होते. परिणामी प्रशासकीय विलंब कमी होतो, पारदर्शकता सुधारते आणि नागरिकांना सुलभरित्या सेवा प्राप्त होतात. महत्वाचे म्हणजे विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, उद्योजक आणि ग्रामीण कुटुंबांना शासकीय लाभ प्राप्त करण्यासाठी फेऱ्या माराव्या लागत नाहीत आणि अत्यावश्यक सेवा कालबद्ध पद्धतीने प्राप्त होतात.

"एक राज्य, एक पोर्टल" ही निव्वळ संकल्पना नाही, तर भविष्यासाठी सज्ज डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा राज्य शासनाचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

# डेटा एकत्रीकरणाद्वारे स्मार्ट प्रशासन



## एकीकृत नोंदी महत्त्वाच्या का आहेत...

देशातील आणि राज्यातील सरकारे डिजिटल-फर्स्ट स्वरूपाच्या प्रशासकीय मॉडेलकडे वाटचाल करत असताना, सेवा ऑनलाइन आणण्यापुरते मर्यादित परिवर्तन अपेक्षित नाही, तर अनेक विभाग एकाच मंचावर एकत्रितपणे काम करू शकतील, अशी सक्षम आणि बुद्धिमान प्रणाली कार्यान्वित असणे अपेक्षित आहे. ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महासारथी हा मंच एकीकृत नागरिक डेटाबेस, परस्पर-संलग्न विभागीय प्रणाली आणि प्रमाणित डिजिटल पडताळणीच्या माध्यमातून डिजिटल प्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे. सुवर्ण नोंदी ही संकल्पना या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी आहे. सुवर्ण नोंद अर्थात नागरिकांच्या माहितीची एकच, सत्यापित आणि विश्वसनीय आवृत्ती, जी अनेक शासकीय सेवांच्या संदर्भात सुरक्षितपणे आणि आवश्यकतेनुसार वापरली जाऊ शकते.

राज्यातील नागरिकांना शासकीय लाभ प्रदान करण्यासाठी आतापर्यंत राज्याच्या विविध विभागांच्या प्रशासकीय प्रणाली स्वतंत्रपणे कार्यरत होत्या. शैक्षणिक नोंदी स्वतंत्रपणे केल्या जात, नागरिकांसाठीच्या कल्याणकारी योजनांची नोंद स्वतंत्रपणे होत असे, महसूल प्रणाली आणि कृषी विभागाच्या नोंदीही स्वतंत्रपणे होत. या सर्व विभागांमध्ये परस्पर समन्वयाचा अभाव होता. प्रत्येक सेवा आणि योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयात जावे लागत असे. वेगवेगळ्या योजना आणि अर्जांसाठी आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र आणि बँकेचा तपशील वारंवार सादर करावा लागत होता. यामुळे सेवा मिळण्यात विलंब, प्रशासकीय कामाच्या भारात वाढ, कागदपत्रे वारंवार सादर करण्याचा त्रास, अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागत असे.

या समस्यांवर मात करण्यासाठी विविध विभागांच्या विश्वसनीय स्रोतांमार्फत विखुरलेली माहिती एकत्र करून नागरिकांचे प्रमाणित प्रोफाइल अर्थात सुवर्ण नोंद तयार करणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. अनेक विभागांनी विखुरलेल्या किंवा विसंगत नोंदी ठेवण्याऐवजी, एकीकृत प्रशासकीय रचनेद्वारे सत्यापित माहिती सुरक्षितपणे प्राप्त होणे अपेक्षित आहे. या माध्यमातून राज्यातील नागरिकांच्या तपशिलांची परिपूर्ण नोंद असलेला विश्वसनीय डिजिटल साठा तयार होतो, जिथे सर्व तपशील अचूक असतात, सेवा वितरण अधिक जलद होते आणि प्रशासन अधिक पारदर्शक बनते.

राज्यभरात, विशेषतः ग्रामीण आणि वंचित भागांमध्ये अशा नोंदी उपयुक्त ठरू शकतात. एका सामायिक डिजिटल प्रशासकीय चौकटीअंतर्गत, प्रमाणित नोंदी आता विभागांमध्ये सुरक्षितरित्या पुन्हा वापरल्या जाऊ शकतात, ज्यामुळे वारंवार कागदपत्रे सादर करण्याची गरज कमी होते. अर्जदाराच्या ओळखीचे तपशील डिजिटल पद्धतीने सत्यापित करता येतात, पात्रतेची तपासणी अधिक वेगाने पूर्ण केली जाऊ शकते आणि अर्जांवर कमी वेळेत प्रक्रिया करणे शक्य होते. अशा प्रकारची एकात्मिक प्रशासकीय प्रणाली कार्यपद्धतीतील अडथळे लक्षणीयरीत्या कमी करू शकते आणि शासकीय सेवांचे वितरण अधिक सुलभ बनवू शकते.

विविध विभागांच्या सुसंगत एकत्रिकरणामुळे सेवा वितरण देखील अधिक सक्षम होते. विभागांना हस्तलिखित प्रतींऐवजी सत्यापित डिजिटल नोंदी प्राप्त होतात. बनावट लाभार्थी, बनावट दावे आणि चुकीच्या मंजुरींचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. शासकीय योजना, अनुदान, शिष्यवृत्ती आणि आर्थिक सहाय्याचे वितरण अधिक पारदर्शकतेने केले जाते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशा प्रकारच्या एकत्रित आणि प्रमाणित नोंदी सक्रिय प्रशासनाची पायाभरणी करतात. नागरिकांनी स्वत:साठी उपयुक्त योजना शोधण्याऐवजी आणि त्यासाठी स्वतः अर्ज सादर करण्याऐवजी, ही प्रणाली शासकीय विभागांना पात्र लाभार्थी स्वयंचलितरित्या ओळखण्याच्या कामी उपयुक्त ठरते.

महासारथीच्या माध्यमातून महाराष्ट्र एका अशा प्रशासकीय परिसंस्थेची पायाभरणी करत आहे, जिथे डेटा एकत्रीकरणामुळे कार्यक्षमतेबरोबरच नागरिकांचा विश्वास, सुलभता आणि सर्वसमावेशकतेत देखील सुधारणा होते.

# टेक वारी 2.0 मध्ये महासारथी



## महासारथीतर्फे लोकाभिमुख नवोन्मेषाचा आविष्कार

टेक वारी 2.0 या लोकप्रिय उपक्रमाच्या माध्यमातून महासारथीच्या चमुने संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी, युवा वर्ग आणि वंचित घटकांसाठीच्या आघाडीच्या डिजिटल उपक्रमांचे सादरीकरण करून, लोकाभिमुख नवोन्मेषाप्रती आपली वचनबद्धता अधोरेखित केली. तंत्रज्ञानाधारित प्रशासन आणि सर्वसमावेशक कल्याणकारी योजना कशा प्रकारे संधी आणि उपलब्धता यांतील तफावत भरून काढण्यास मदत करत आहेत, हे या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून अधिक समताधिष्ठित आणि डिजिटलदृष्ट्या सक्षम समाजाची निर्मिती करण्याच्या महासारथीच्या दृष्टीकोनाला बळ मिळाले.










MAHAIT


MAHAIT
TECH-वारी 2.0
महाआयडी


MAHAIT
महाआयडी
mahasarathi.maharashtra.gov.in

# जिद्दीला मिळाले पंखाचे बळ




## भार नव्हे, आधार बनला अब्दुल

हिंगोली जिल्ह्यातील वसमत शहरातील सोमवार पेठ हा गजबजलेला परिसर. इथे राहतात साधे आयुष्य जगणारी तितकीच साधी माणसे. संघर्ष काय असतो, हे या परिसरात राहणाऱ्या वाहेद कुटुंबाकडे पाहून समजते. सहा मुले, आई-वडील आणि मर्यादित उत्पन्नावर उदरनिर्वाह करणारे कुटुंब. शेख अब्दुल खालिद वाहेद हे या कुटुंबातील चौथे अपत्य. आज अब्दुल या भागातील यशस्वी, चांगला सल्लागार आणि विश्वासार्ह व्यक्ती म्हणून ओळखला जातो, पण एक काळ असा होता, जेव्हा तो स्वतःलाच 'कुटुंबावरचा भार' समजत होता. त्याच्या आजच्या ओळखीशी विसंगत वाटले, तरी ही वस्तुस्थिती होती, हे मात्र खरे.

जन्म झाला तेव्हा अब्दुल निरोगी होता, पण घरातील बिकट परिस्थिती, मोठ्या भावंडांची आजारपणे आणि त्यात झालेले दुर्लक्ष यामुळे त्याला पोलिओ झाला. पोलिओमुळे त्याचे दोन्ही पाय अधू झाले आणि त्याच्यासमोर मोठी आव्हाने उभी राहिली. इतर मुलांसारखे धावणे, खेळणे, शाळेतल्या मैदानावर मोकळेपणाने कवायती करणे हे सगळे त्याच्यासाठी स्वप्नवतच राहिले. तो घराच्या ओट्यावर बसून इतर मुलांना खेळताना पाहायचा. त्याच्या मनातही खेळण्याची, धावण्याची इच्छा असे, पण पायांची साथ नव्हती. घरात त्याला इतर भावंडांपेक्षा वेगळी वागणूक मिळत असे. आपल्या उपचारांसाठी अम्मी-अब्बूंना स्वतःच्या पोटाला चिमटे काढून पैसे जमवताना तो पाहात असे. या सर्व घटना आणि नियतीने घालून दिलेली मर्यादा यामुळे आपण वेगळे आहोत, अपूर्ण आहोत आणि कुटुंबावर ओझे आहोत, अशी भावना त्याच्या मनात निर्माण झाली. त्याच वेळी, "आपण कुटुंबासाठी जमेल ते केले पाहिजे, हा विचारही दृढ होत गेला. लहानपणापासून शांत, समजूतदार आणि जबाबदार असणारा अब्दुल वयाच्या मानाने लवकर परिपक्व झाला.

अभ्यासात त्याला चांगली गती होती. परिस्थिती कठीण असली तरी त्याने शिक्षण अर्धवट सोडले नाही. शाळेत आणि पुढे महाविद्यालयातही चांगले गुण मिळवत त्याने बी. कॉम. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. शिक्षणामुळे आयुष्य बदलेल, नोकरी मिळेल आणि आपण कुटुंबाचा आधार बनू, अशी आशा त्याला वाटत होती. नोकरीसाठी त्याने अनेक ठिकाणी प्रयत्न केले, पण प्रत्येक वेळी दिव्यांग असल्याच्या कारणावरून त्याला नकार मिळत राहिला. काहींनी सरळ नकार दिला, काहींनी सहानुभूती दाखवली पण संधी दिली नाही. ही नकारांची मालिका त्याच्या आत्मविश्वासावर घाव घालत राहिली.

विपरित आर्थिक परिस्थितीमुळे अब्दुलच्या कुटुंबावर एक कठीण निर्णय घेण्याची वेळ आली. नांदेडमधील अपंगांसाठीच्या संस्थेत अब्दुलला दाखल करण्याची चर्चा घरात सुरू झाली. तिथे त्याची व्यवस्थित काळजी घेतली जाईल, असा विचार कुटुंबाने केला. अब्दुलसाठी मात्र हा क्षण अंतर्मुख करणारा होता. "मी खरंच इतका असहाय्य आहे का?" या विचाराने तो अगतिक झाला होता, आणि त्याच वेळी त्याच्या आयुष्यात एक निर्णायक वळण आले.

अब्दुलच्या मोठ्या भावाला महा ई सेवा केंद्राची माहिती मिळाली. शासनाच्या या उपक्रमाबद्दल त्याने अब्दुलला सांगितले. "ही संधी तुझ्यासाठीच आहे" या भावाच्या वाक्याने अब्दुलच्या मनात आशा निर्माण झाली. त्याने लगेच महा ई सेवा केंद्राची माहिती आणि प्रक्रिया समजून घेतली, आपले प्रयत्न सुरू केले. लवकरच त्याला महा ई सेवा केंद्र अर्थात आताचे 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्याची संधी मिळाली, आणि या एका प्रसंगाने त्याचे अवघे आयुष्य बदलून गेले.

केंद्र सुरू झाले, पण सुरुवात सोपी नव्हती. नागरिकांना त्याच्याबद्दल फारसा विश्वास वाटत नव्हता. "हा काय काम करणार?" "आपली कागदपत्रे याच्याकडे द्यायची का?" असे प्रश्न नागरिकांच्या मनात होते. अगदी त्याच्या कुटुंबीयांनाही काहीशी शंका वाटत होती. या सर्वांना आपल्या कामातून उत्तर द्यायचे, असे अब्दुलने ठरवले. तो एसटीमधून विविध शासकीय कार्यालयांमध्ये जाऊ लागला, कागदपत्रे जमा करू लागला, अर्जांचा पाठपुरावा करू लागला. प्रत्येक काम वेळेवर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू लागला.

हळूहळू परिस्थिती बदलू लागली. एका वृद्ध महिलेला बराच काळ दाखला मिळत नव्हता. ती निराश होऊन केंद्रात आली. अब्दुलने तिला

विश्वास दिला. “माई, तुमचे काम मी करून देतो”, असे सांगत त्याने पुढाकार घेतला, नियमानुसार सर्व प्रक्रिया करून त्यांना हवे असलेले प्रमाणपत्र मिळवून दिले. काही दिवसांतच हे काम पूर्ण करून दिल्याने केंद्राच्या परिसरात अब्दुलच्या कामाची चर्चा होऊ लागली आणि स्थानिकांचा त्याच्यावरील विश्वास वाढू लागला.

काळानुसार केंद्राचे डिजिटायझेशन आणि नामकरण झाले. ऑनलाइन सेवा सुरू झाल्या, प्रक्रिया सुलभ झाली आणि कामाचा वेग वाढला. नागरिकांना जलद आणि पारदर्शक पद्धतीने सेवा मिळू लागल्या. “आधी आठवडे लागायचे, आता काही दिवसांत काम होते,” अशा शब्दांत नागरिक समाधान व्यक्त करू लागले. अब्दुलचे ‘आपले सरकार सेवा केंद्र’ या परिसरात विश्वासार्ह म्हणून ओळखले जाऊ लागले.

आज अब्दुलच्या केंद्रावर नागरिकांची सतत वर्दळ असते. अब्दुलचे दोन भाऊही त्याच्यासोबत काम करतात. कुटुंबाचा संपूर्ण उदरनिर्वाह त्याच्यावर अवलंबून आहे. ज्याच्याकडे एकेकाळी ओझे म्हणून पाहिले जात होते, तोच आज कुटुंबाचा आधार बनला आहे. त्याने पक्के घर बांधले, दुकान वाढवले, बहिणींचे विवाह केले आणि कुटुंबाला स्थैर्य दिले. आज अब्दुलच्या अम्मी-अब्बूंच्या डोळ्यात समाधान आणि आनंद दिसतो.

समाजातही त्याची ओळख बदलली आहे. आज अब्दुल केवळ सेवा केंद्र चालक नाही, तर मार्गदर्शक सुद्धा आहे. स्थानिक रहिवासी त्याच्याकडे सल्ला मागायला येतात, त्याच्यावर विश्वास ठेवतात. एकेकाळी त्याच्यापासून दूर राहणारे लोक आज त्याच्याकडे आदराने पाहतात. तो सुद्धा प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वात आता आत्मविश्वास, स्थैर्य आणि सकारात्मकता दिसून येते.

अब्दुल म्हणतो, “शासनाच्या या उपक्रमामुळे मला नवे आयुष्य मिळाले. आत्मविश्वास मिळाला. मी निराशेतून बाहेर आलो. आज मी स्वतःच्या पायावर उभा आहे.” त्याच्या आवाजातला आत्मविश्वास आणि डोळ्यांतली चमक त्याच्या यशाची साक्ष देतात.

अब्दुलची कथा ही केवळ एका व्यक्तीची यशोगाथा नाही, तर ती शासनाच्या डिजिटल उपक्रमांची परिणामकारकता दाखवणारी प्रेरणादायी कहाणी आहे. ‘आपले सरकार सेवा केंद्र’ नागरिकांना सेवा देण्याबरोबरच त्यांना सक्षम करण्यासाठीदेखील उपयुक्त आहे, हे अब्दुलच्या प्रवासातून दिसून येते. योग्य संधी, योग्य मार्गदर्शन आणि जिद्द असेल, तर कोणत्याही अडचणीतून मार्ग काढता येतो, हे अब्दुलने सिद्ध केले आहे.

वसमतमधल्या एका गावातला हा मुलगा आज अनेकांसाठी प्रेरणा बनला आहे. अपंगत्व ही मर्यादा नाही. संधी मिळाली आणि प्रामाणिक प्रयत्न केले तर प्रत्येकजण स्वतःचे आयुष्य घडवू शकतो, हे दाखवून देणाऱ्या अब्दुलच्या आत्मवश्वासाची आणि डिजिटल सक्षमीकरणाची ही कथा आहे.

# डिजिटल परिवर्तक



## डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांचे सक्षमीकरण

डिजिटल प्रशासनाच्या वेगाने बदलणाऱ्या परिदृश्यात, शासकीय सेवांचे लाभ नागरिकांना प्रदान करण्याच्या कामी समर्पित वृत्तीचे स्थानिक उद्योजक परिवर्तनकारी भूमिका बजावत आहेत. 2013 सालापासून 'आपले सरकार सेवा केंद्र' आणि 'आधार केंद्रा'च्या माध्यमातून शासकीय सेवा प्रदान करणारे महाराष्ट्रातील परभणी तालुक्यातील सचिन दत्तात्रय शेटे, हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहे.

सेवांचे वितरण करणारे केंद्र म्हणून सुरु झालेला हा प्रवास, आता परभणी शहर आणि परिसरातील हजारो नागरिकांसाठी सार्वजनिक सेवांचा विश्वासार्ह मंच ठरला आहे. सचिन शेटे यांनी केवळ आपले सरकार सेवा केंद्र उभारले नाही तर गेल्या काही वर्षांत त्यांनी सामाजिक बांधिलकी, लोकांचा विश्वास आणि नागरिक सक्षमीकरणाला हातभार लावणारी स्वतंत्र ओळखही निर्माण केली आहे.

सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय सहभागाचा वारसा असलेल्या कुटुंबाचे संस्कार लाभलेले सचिन शेटे यांना, 'आपले सरकार सेवा केंद्रा'च्या माध्यमातून जनसेवेची परंपरा पुढे चालवण्याची सुवर्णसंधी मिळाली. 'आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून त्यांनी असंख्य नागरिकांना अत्यावश्यक शासकीय योजना, दाखले, आधार सेवा आणि ऑनलाइन दस्तऐवजीकरणाच्या सुविधा मिळवून देण्यास मदत केली.

परभणी जिल्ह्यातील कार्यक्षम आणि नागरिक-स्नेही केंद्र अशी ओळख त्यांच्या केंद्राला लाभली आहे. त्याचबरोबर त्यांचा हा उपक्रम उपजीविका आणि रोजगार निर्मितीचे साधनही ठरतो आहे. बेरोजगार असणारे चार तरुण सध्या त्यांच्या केंद्रात काम करत आहेत आणि त्याच वेळी आपले शिक्षणही पूर्ण करत आहेत. त्यांच्या केंद्रात यापूर्वी काम केलेले अनेक तरुण आता सरकारी नोकऱ्या, न्यायालयीन सेवा आणि खाजगी कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत, ही त्यांच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

सचिन शेटे यांच्या मते खरे यश हे केवळ वैयक्तिक प्रगतीत नसून इतरांसाठी संधी निर्माण करण्यात सामावलेले असते. या उदात्त विचारसरणीमुळेच हे केंद्र त्यांच्या संपूर्ण जिल्ह्यात नावाजले जाते आहे. वंचित आणि गरजू नागरिकांप्रती मानवतावादी दृष्टिकोन, हा सचिन शेटे यांच्या कार्याचा सर्वात उल्लेखनीय पैलू होय. आधार केंद्राच्या माध्यमातून गंभीर आजार, मानसिक दिव्यांगत्व किंवा गतीमंद व्यक्तींना शासकीय सेवांचे लाभ विनासायास मिळावेत, यासाठी त्यांनी त्यांच्या घरी स्वतः भेटी दिल्या आहेत.

परभणी जिल्हाधिकारी कार्यालय आणि 'विहान फाउंडेशन' यांच्या सहयोगाने, एचआयव्ही बाधितांसाठी आयोजित विशेष शिबिरांमध्येही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. या उपक्रमांदरम्यान, शासकीय योजनांचे लाभ आणि आर्थिक मदत मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या आधार प्रक्रिया, उत्पन्नाचे दाखले आणि ऑनलाइन दस्तऐवजीकरणाची पूर्तता करण्यासाठी त्यांनी लाभार्थ्यांना मदत केली आहे.

आजारपण आणि आर्थिक अडचणींमुळे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करु न शकलेल्या एका एचआयव्ही बाधित रुग्णाला सचिन शेटे यांनी केलेली मदत विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन 'विहान फाउंडेशन' च्या माध्यमातून या लाभार्थ्याला आधार प्रमाणीकरण, उत्पन्नाचे दाखले मिळवणे आणि ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे या कामांमध्ये मदत केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे सदर लाभार्थ्याला शासकीय आरोग्य सेवा आणि आर्थिक मदत मिळवणे शक्य झाले. त्या लाभार्थ्यासाठी आणि त्याच्या कुटुंबासाठी सचिन शेटे देवदूत ठरले आहेत.

समावेशक प्रशासनाप्रती आग्रही भूमिकेमुळे त्यांना जिल्हा प्रशासनाकडून विशेष कौतुक आणि सन्मान प्राप्त झाला आहे. एचआयव्ही बाधितांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यातील योगदानाबद्दलही प्रमाणपत्र प्रदान करून त्यांना गौरवण्यात आले आहे.

# समावेशक प्रशासन



## आधार नोंदणी उपक्रमाने अहमदपूरमध्ये जागवली नवी आशा

प्रशासकीय सेवा प्रक्रियांची चाकोरी मोडून सामाजिक जबाबदारी आणि सहृदयतेचे दर्शन घडवू शकतात, हे दाखवून देणारे, महाराष्ट्राच्या लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील आपले सरकार सेवा केंद्र, नागरिक-केंद्रीत प्रशासनाचे प्रेरक उदाहरण ठरले आहे.

शारीरिक मर्यादांमुळे घराबाहेर पडण्यास असमर्थ असणाऱ्या दिव्यांग तरुणाची हतबलता लक्षात घेत, या लाभार्थ्याला घरपोच आधार नोंदणी सेवा प्राप्त होईल, याची खातरजमा अहमदपूर प्रशासनाने केली. प्रबळ इच्छाशक्ती आणि कर्तव्याप्रति बांधिलकी असल्यास शासकीय सेवा खरोखरच समाजातील तळागाळापर्यंत पोहोचू शकतात, हे या उदाहरणाने दाखवून दिले आहे.

हे केवळ उत्तम प्रशासनाचे उदाहरण नाही तर त्यातून संवेदनशीलता, सर्वसमावेशकता आणि मानवता ही शाश्वत मूल्ये प्रतिबिंबित होतात. 'डिजिटल ओळख' ही शासकीय योजनांचे लाभ प्राप्त करण्यासाठी अत्यावश्यक असणाऱ्या आजच्या काळात असे उपक्रम वंचित नागरिकांसाठी वरदान ठरतात.

आजच्या डिजिटल प्रशासन व्यवस्थेत 'आधार' हे निव्वळ ओळखपत्र राहिलेले नाही. विविध शासकीय योजना आणि अत्यावश्यक सेवांचा लाभ प्राप्त करण्याचे साधन म्हणून आधार क्रमांकाचा प्रभावी वापर केला जातो. निवृत्तीवेतन, शिधापत्रिकेवरील लाभ, आरोग्यसेवा, बँकिंग सुविधा, शिष्यवृत्ती आणि सामाजिक योजना आता 'आधार प्रमाणीकरणाशी' जोडल्या गेल्या आहेत.

मात्र या आधार नोंदणीच्या अभावी अहमदपूर तालुक्यातील एक दिव्यांग तरुण अनेक शासकीय लाभांपासून दीर्घकाळ वंचित राहिला होता. शारीरिक मर्यादांमुळे आधार नोंदणीसाठी केंद्रावर जाणे त्याला शक्य नव्हते. त्यामुळे 'निराधार योजनेसह इतर अनेक शासकीय लाभ मिळवण्यास पात्र असतानासुद्धा त्याला ते प्राप्त होत नव्हते. आधार क्रमांकच नसल्यामुळे, त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह ज्या आर्थिक मदतीवर अवलंबून होता, ती मदतही थांबली होती, आणि त्याच्या कुटुंबाची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत होती.

ही बाब, अहमदपूरमधल्या महाआयटी चमूच्या लक्षात आली, आणि त्यांनी या कामी पुढाकार घ्यायचे ठरवले. या समस्येकडे एक प्रशासकीय प्रश्न म्हणून न पाहता, मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांनी विचार केला, आणि ही सेवा थेट लाभार्थ्याच्या घरी जाऊनच देण्याचा निर्णय घेतला.

या प्रकरणी संवेदनशील दृष्टिकोन बाळगत, महाआयटीच्या चमुने आधार नोंदणीसाठी एक विशेष पथक लाभार्थ्यांच्या निवासस्थानी पाठवण्याची व्यवस्था केली. सदर दिव्यांग तरुणाच्या घरी जाऊन, या अधिकाऱ्यांनी बायोमेट्रिक नोंदी घेत, कागदपत्रांची तपासणी केली, आणि त्याच्या आधार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण केली.

ही केवळ एक तांत्रिक प्रक्रिया नव्हती, तर मानवता आणि सर्वसमावेशकतेच्या तत्वाचा स्वीकार करणाऱ्या प्रशासनाचे एक प्रभावी उदाहरण होते. 'आधार' अभावी शासकीय लाभ प्राप्त करण्याची आशा मावळली होती, अशा वेळी त्या तरुणासाठी आणि त्याच्या कुटुंबासाठी हा सुखद धक्का ठरला. या उपक्रमामुळे त्यांच्या मनात नवा आत्मविश्वास आणि शासनाप्रति आशावाद निर्माण झाला.

मानवी प्रयत्नांना प्रशासकीय संवेदनशीलतेची जोड मिळते, तेव्हा तंत्रज्ञानावर आधारित प्रशासन किती प्रभावीपणे काम करते, हे या आधार नोंदणीच्या प्रकरणातून ठळकपणे अधोरेखित झाले.

महाआयटीचा चमू आणि स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या राबवण्यात आला. आधार नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक असलेला तांत्रिक समन्वय सुरळीतपणे पार पाडण्याच्या कामी महाआयटी'चे अधिकारी रिझवान आणि विजेंद्र यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

आधार केंद्राचे संचालक संभाजी भिवाजी मुळे आणि आधार परिचालक मंगेश गणपती मुळे यांनी, तसेच चमुचे सदस्य प्रमोद गावकावड आणि शुभम माने यांच्या सहकार्याने ही अंमलबजावणी पार पाडली. या चमुने लाभार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन, आधार नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बायोमेट्रिक आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्या.

प्रशासकीय विभाग, तांत्रिक पथके आणि क्षेत्रीय स्तरावरील कर्मचारी हे सर्वजण एकत्रितपणे, अत्यंत संवेदनशील आणि मानवतावादी पद्धतीने नागरिक सेवा कशा प्रभावीपणे पुरवू शकतात, हे त्यांच्या समन्वित प्रयत्नांतून दिसून आले.

आधार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे, या दिव्यांग तरुणाला 'निराधार योजने'अंतर्गत मिळणारे लाभ पुन्हा प्राप्त होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. काही काळासाठी थांबलेली आर्थिक मदत लवकरच पुन्हा सुरू होईल, ज्यामुळे आपल्याला पुन्हा एकदा दिलासा आणि स्थैर्य प्राप्त होईल, असा विश्वास या कुटुंबाला वाटतो आहे.

या कुटुंबासाठी आधार नोंदणी म्हणजे केवळ आधार ओळख क्रमांक मिळवण्यापुरते मर्यादित नव्हती, तर त्याद्वारे त्यांना आपला सन्मान आणि सुरक्षिततेची हमी मिळणार होती. संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः घरी येऊन मदतीचा हात पुढे करण्याची जी तत्परता दाखवली, त्यावरून सरकारला खरोखरच सामान्य नागरिकांची काळजी आहे, असे वाटले, अशा शब्दांत या कुटुंबाने आपल्या भावना व्यक्त केल्या.

'डिजिटल प्रशासना'चे खरे यश केवळ तंत्रज्ञानात नसून, ते सेवांच्या सुलभतेमध्ये आणि प्रशासकीय संवेदनशीलतेमध्ये सामावलेले आहे, हे यावरून दिसून येते. आजघडीला राज्यासह देशभरातील अनेक वृद्ध नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि गंभीर आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण, शारीरिक मर्यादांमुळे शासकीय लाभांपासून वंचित राहिले आहेत. अशा नागरिकांसाठी काय करता येईल, त्याचे प्रात्यक्षिक अहमदपूर येथील अधिकाऱ्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

प्रशासकीय संवेदनशीलता, तांत्रिक सहाय्य आणि क्षेत्रीय स्तरावरील समर्पित अंमलबजावणी अशा एकत्रित प्रयत्नांच्या बळावर लोकांचे जीवन आमूलाग्र बदलता येते, हे या उदाहरणावरून दिसून येते. अशा उपक्रमांमुळे जनतेचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होतो. 'डिजिटल समावेशन' आणि 'सामाजिक कल्याण' साध्य करण्याच्या या प्रवासात कोणताही नागरिक मागे राहू नये, ही संकल्पना अधिक बळकट होते.



# सक्षमीकरणाकडे वाटचाल




## विजय कोपनार:
## धैर्य आणि सेवेचा प्रेरणादायी प्रवास

पुण्यातील औंध या मध्यवर्ती ठिकाणी राहणारे विजय गेनबा कोपनार यांनी दृढनिश्चय आणि लोकसेवेप्रती वचनबद्धतेच्या बळावर अनेकांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. दिव्यांग उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ आणि डिजिटल सेवा पुरवठादार असणारे विजय कोपनार यांची कथा निश्चितच प्रेरक आहे, आपल्या यशोगाथेच्या माध्यमातून ते स्वावलंबन आणि नागरिक सक्षमीकरणाचे प्रतीक ठरले आहेत.

62% शारीरिक दिव्यांगत्व असणारे विजय कोपनार यांनी आयुष्यात अनेक आव्हानांना समर्थपणे तोंड दिले, मात्र त्या आव्हानांना त्यांनी आपल्या भविष्याची दिशा ठरवू दिली नाही. राज्य शासनाच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' उपक्रमाच्या बळावर त्यांनी सन्मान, स्वावलंबन आणि अर्थपूर्ण सामाजिक योगदानाकडे जाणारा मार्ग निवडला. पुण्यातील औंध येथे असलेल्या 'महा-ई-सेवा' आणि 'आधार सेवा केंद्रा'च्या माध्यमातून, ते हजारो नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ मिळवून देण्याचे काम निष्ठेने करत आहेत.

2019 साली पुण्यातील औंध येथे विजय कोपनार यांनी आपले सरकार सेवा केंद्र सुरू केले. नागरिकांना शासकीय सेवा आणि आवश्यक दस्तावेज सहजपणे उपलब्ध करून देणारा हा उपक्रम शासनाला नागरिकांपर्यंत पोहोचवणारा विश्वासार्ह दुवा ठरला आहे. आधार कार्ड अद्यतन, पॅन कार्ड, जात प्रमाणपत्रे, अधिवास प्रमाणपत्रे, उत्पन्न प्रमाणपत्रे, नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्रे, जात पडताळणी दाखले, अशा अनेक सेवा त्यांच्या केंद्रावरून प्रदान केल्या जातात.

गेल्या काही वर्षांत, या एकाच केंद्राच्या माध्यमातून त्यांनी 5,000 पेक्षा जास्त नागरिकांना यशस्वीपणे सेवा प्रदान केल्या आहेत. पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सुलभता यांची खात्री असल्यामुळे परिसरातील रहिवासी आता त्यांच्या केंद्राला विश्वासाने भेट देतात.

विजय कोपनार यांचे योगदान केवळ नागरिक सेवांपुरते मर्यादित नाही. डिजिटल साक्षरता आणि शिक्षणाचा प्रसार करण्यातही ते सक्रिय सहभागी आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सामाजिक विकास विभागात सध्या ते 'संगणक चालक' म्हणून कार्यरत आहेत. तिथे ते संगणक प्रशिक्षण देतात आणि नागरिकांना डिजिटलदृष्ट्या साक्षर करतात.

शिक्षण क्षेत्राबाबत त्यांच्या मनात विशेष तळमळ आहे. जून 2000 मध्ये त्यांनी "ज्ञानसिद्धी क्लासेस" सुरू केले आणि त्यानंतर 2012 मध्ये "ज्ञानसिद्धी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट"ची स्थापना केली. या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी सुमारे 6,000 विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले असून, त्यांना शैक्षणिक ज्ञान आणि संगणकाची कौशल्ये प्रदान केली आहेत. सर्वसाधारण परिस्थिती असलेल्या अनेक विद्यार्थ्यांसाठी त्यांचे मार्गदर्शन हे करिअरच्या उत्तम संधी मिळवण्यासाठी उपयुक्त ठरले आहे.

विजय कोपनार यांच्या मते प्रामाणिकपणा आणि निष्ठेने समाजाची सेवा करण्यातच खरे यश सामावलेले आहे. पारदर्शक पद्धतीने सेवा प्रदान करून त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे. इच्छाशक्तीला शासकीय योजनांची साथ लाभली की दिव्यांगत्वावर सुद्धा मात करता येते, आणि लोकसेवेचे व्रत पूर्ण करता येते, हे दाखवणारा विजय कोपनार यांचा हा प्रवास समाजातील अनेकांसाठी प्रेरक आहे.

# टेकवारी 2.0




*मुंबईतील मंत्रालय येथे आयोजित टेक-वारी 2.0 – महा-टेक लर्निंग वीकचे उद्घाटन करताना मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस.*

## भविष्यसज्ज प्रशासनासाठी परिवर्तनकारक उपक्रम

वेगवान डिजिटल परिवर्तन आणि तांत्रिक प्रगतीच्या आजच्या युगात शासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनवण्याची गरज वाढते आहे. याच दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने 'टेक वारी 2.0 महा टेक लर्निंग वीक' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन केले. हा केवळ एक प्रशिक्षण कार्यक्रम नसून, तंत्रज्ञानाधारित शासनासाठी सुरू झालेली व्यापक चळवळ, असे याचे स्वरुप होते.

माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन झाले. या टेक वारीमध्ये शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये सतत शिकण्याच्या संस्कृतीला प्रोत्साहन देण्यावर, तसेच त्यांना बदलत्या डिजिटल युगाशी संबंधित कौशल्यांनी सुसज्ज करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. विविध क्षेत्रांतील तज्ञांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा, डिजिटल फायनान्स, डेटा गव्हर्नन्स आणि वर्क-लाइफ बॅलन्स अशा महत्त्वाच्या विषयांवर आयोजित सत्रांमध्ये आपले विचार मांडले. धोरणकर्ते, तंत्रज्ञ आणि संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांना एकाच मंचावर एकत्र आणणारा हा पाच दिवसीय 'महा टेक लर्निंग वीक' 4 मे ते 8 मे या अवधीत मुंबईतील मंत्रालयात आयोजित करण्यात आला.

व्यापक प्रशिक्षण चळवळ स्वरूपात हा कार्यक्रम तयार करण्यात आला असून, त्यात 6,000 पेक्षा जास्त अधिकारी प्रत्यक्ष तर जवळपास 9 लाख अधिकारी-कर्मचारी थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून सहभागी झाले. भविष्यासाठी सज्ज आणि डिजिटलदृष्ट्या सक्षम प्रशासन उभारण्याच्या राज्याच्या वचनबद्धतेचे हे प्रतीक ठरले. माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा यांच्या उपस्थितीत झालेल्या उद्घाटन सत्राने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला, आणि नवोन्मेष, सहकार्य तसेच प्रशासकीय उत्कृष्टतेवर लक्ष केंद्रित करणाऱ्या एका परिवर्तनकारक प्रवासाला सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "तंत्रज्ञान केवळ लोकांचे जीवन बदलत नाही, तर ते समाजाला सक्षम करते. एआय एजंट्स, ब्लॉकचेन आणि डिजिटल नवकल्पनांच्या साहाय्याने आमचे सरकार एक अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि भेदभावरहित व्यवस्था तयार करते आहे. ही तांत्रिक क्रांती, वेग, प्रशासन आणि नोकऱ्यांचे भविष्यही नव्याने परिभाषित करेल."

माननीय उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी सर्वसमावेशक आणि मानवकेंद्रित शासनाच्या महत्त्वावर भर देताना सांगितले, "तंत्रज्ञान हे अंतिमतः लोकांच्या सेवेसाठीच असले पाहिजे. टेक वारी 2.0 सारखे उपक्रम हे केवळ नवीन साधने शिकण्यापुरते मर्यादित नाहीत, तर आपल्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला उत्तम सेवा, जलद परिणाम आणि अधिक सर्वसमावेशक शासन देण्यासाठी सक्षम करण्यासाठी आहेत."




*टेक-वारी 2.0 हे नागरिककेंद्रित आणि भविष्याभिमुख सुशासनाच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, ते अधिकाऱ्यांना तंत्रज्ञान, स्वयंविकास, कार्यक्षमता आणि आधुनिक प्रशासकीय दृष्टिकोनाने सक्षम बनवणारी चळवळ आहे, असे मा. उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.*

या उपक्रमांर्गत 'तालरंग - लय आणि सांघिक कार्याचा प्रवास' या विशेष सांस्कृतिक सादरीकरणाने समन्वय, शिस्त आणि सामूहिक प्रयत्न या शासनाच्या मूलभूत मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

"बदलत्या जगातील डिजिटल प्रशासन" या विषयावरील तांत्रिक सत्रात डॉ. विवेक राघवन (सर्वम एआयचे सह-संस्थापक) यांच्यासह अनेक नामवंत वक्ते सहभागी झाले. श्री. सदानंद दाते (डीजीपी महाराष्ट्र), सुश्री राधा चौहान (सीबीसी अध्यक्ष), श्री. अमिताभ कांत (माजी सीईओ, नीति आयोग), श्री. राजेश अग्रवाल (मुख्य सचिव, महाराष्ट्र) या मान्यवरांचा त्यात सहभाग होता.

डॉ. विवेक राघवन म्हणाले, "भारत आपल्या डिजिटल प्रवासातील एका निर्णायक वळणावर उभा आहे, जिथे कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ नवोन्मेषापुरती मर्यादित नसून प्रशासकीय परिवर्तनाचे प्रतीक आहे. एआय'ने नागरिकांची सेवा करावी, असे आपल्याला वाटत असेल, तर आपण भारतातच रचना केलेल्या, आणि विकसित केलेल्या परिपूर्ण एआय प्रणाली तयार केल्या पाहिजेत. आपली भाषा, विविधता आणि आपला आवाका समजून घेणारी मॉडेल्स तयार करणे, असा याचा अर्थ होय."

"सेवा पुरवून, तक्रारींचे निवारण करून किंवा निर्णय प्रक्रियेला सहाय्य करून एआय प्रशासनाला अधिक जलद, पारदर्शक आणि सर्वसमावेशक बनवू शकते. मात्र हे परिवर्तन जबाबदार, सुरक्षित आणि जनहिताशी सुसंगत असले पाहिजे. जे देश आज त्यांच्या स्वतःच्या एआय परिसंस्थांमध्ये गुंतवणूक करतील, ते उद्या जगाचे नेतृत्व करतील. सार्वजनिक हितासाठी एआय विकसित करण्यामध्ये जागतिक मापदंड स्थापित करण्यासाठी भारताकडे प्रतिभा आणि संधी दोन्ही आहेत."

या सत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा-आधारित प्रणाली, सायबर सुरक्षा आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा कशाप्रकारे भारतातील शासन आणि सेवा वितरणाला नव्याने आकार देत आहेत यावर चर्चा करण्यात आली. टेकवारी 2.0 चा व्यापक दृष्टीकोन अधिकाऱ्यांना सायबर सुरक्षा आणि डेटा संरक्षणापासून एआय आणि क्वांटम कंप्युटिंगपर्यंतच्या विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाला समजून घेण्यास आणि प्रशासनामध्ये त्यांचा प्रभावीपणे वापर करण्यास मदत करणारा आहे, हे या निमित्ताने अधोरेखित झाले.

"तंत्रज्ञान स्थिर नसते, तर ते मानवी संस्कृती आणि जाणिवेसोबत सतत विकसित होत असते," असे महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, श्री राजेश अग्रवाल यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले.
ते म्हणाले, "नवी प्रगती ही तंत्रज्ञानाच्या उत्क्रांतीची कहाणी आहे. लाखो वर्षांपूर्वी उत्क्रांतीच्या काळात मानवाने अवजारे आणि अग्नीचा वापर करण्यास सुरुवात केली. त्यामुळे केवळ जगण्याच्या पद्धतीतच नव्हे, तर संस्कृती आणि खाद्यसंस्कृतीतही परिवर्तन घडून आले. हळूहळू भाषा उदयास आली, संस्कृती विकसित झाल्या. कालांतराने संवाद आणि नवनिर्मितीच्या माध्यमातून मानवी बुद्धिमत्तेचा विस्तार झाला. आज मानव कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून आणखी एका ऐतिहासिक स्थित्यंतराचा साक्षीदार ठरतो आहे. आपण एआय उत्क्रांतीच्या अनेक स्तरांमधून वाटचाल करत आहोत, ज्यात बुद्धिमत्तेवर आधारित प्रणालींपासून चेतनेवर आधारित प्रणालींच्या दिशेने प्रवास सुरु आहे."



"भविष्यात तंत्रज्ञान पूर्णपणे संवादात्मक होऊ शकते, जिथे लोक आज्ञा टाइप करण्याऐवजी किंवा ॲप्लिकेशन्स वापरण्याऐवजी आवाज, प्रतिमा आणि भावनांच्या माध्यमातून नैसर्गिकरित्या संवाद साधतील. इलॉन मस्क नेहमी म्हणतात त्याप्रमाणे भविष्यातील इंटरफेस अखंड आणि मानवासारखा असेल. मानवी मूल्ये आणि जाणीव जपत समाजाला सक्षम करता येईल, यासाठी ही तांत्रिक उत्क्रांती नैतिक, सर्वसमावेशक आणि मानवकेंद्रित राखता येणे, हे आपल्यासमोरचे आव्हान आहे."

टेक वारी 2.0 या उपक्रमात तंत्रज्ञानावरील चर्चांबरोबरच मानसिक आरोग्य, पालकत्व आणि संज्ञानात्मक विकासाच्या सत्रांचाही समावेश होता, हे विशेष.

मनशक्ती संशोधन केंद्रातर्फे 'मुलांसाठी अभ्यास पद्धती सुधारणे' या विषयावरील, तसेच संज्ञानात्मक कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करणारे "मेंदूच्या क्षमतांचा इष्टतम वापर" या विषयावरील सत्र आयोजित करण्यात आले. प्रभावी प्रशासनासाठी तांत्रिक कौशल्यांबरोबरच मानसिक सुस्पष्टता, भावनिक संतुलन आणि सातत्यपूर्ण धारणाही आवश्यक असते, हे यावरून दिसून आले.

क्षमता उभारणी आयोगाच्या अध्यक्षा सुश्री राधा चौहान म्हणाल्या, "कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित क्षमता उभारणी केवळ वैयक्तिक शिक्षणापुरती मर्यादित न राहता ती संस्थात्मक परिवर्तनाचा भाग बनली पाहिजे. मिशन कर्मयोगी आणि i G O T उपक्रमाच्या माध्यमातून, आम्ही एक भविष्य-सज्ज नागरी सेवा व्यवस्था तयार करत आहोत, जिथे अधिकारी सातत्याने आपली कौशल्ये अद्ययावत करतात आणि संस्थांसह ते सुद्धा विकसित होतात. हे तंत्रज्ञान प्रशासकीय कार्यप्रवाह, निर्णयप्रक्रिया आणि नागरिक सेवा वितरणात खोलवर रुजेल, तेव्हाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुयोग्य ठरेल."

महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक श्री सदानंद दाते यांनी या सत्राला मार्गदर्शन करताना सांगितले, "तंत्रज्ञान पोलीस यंत्रणेत अभूतपूर्व बदल घडवत आहे. डिजिटल प्रणाली आणि एकात्मिक प्रतिसाद यंत्रणांमुळे, अनेक प्रकरणांमध्ये तक्रार निवारणाचा वेळ सात



*बदलत्या जगातील डिजिटल सुशासन' या तांत्रिक सत्रात मार्गदर्शन करताना क्षमता विकास आयोगाच्या अध्यक्षा सौ. एस. राधा चौहान*

मिनिटांपेक्षा कमी झाला आहे. सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही सीसीटीव्ही नेटवर्कमुळे चोरी आणि दरोड्यासारखे गुन्हे कमी होण्यास लक्षणीय मदत झाली आहे. त्याच वेळी म्युल अकाउंट्स, ड्रोन-आधारित तस्करी आणि संकरित युद्धतंत्र अशा आद्यकालीन धोक्यांमुळे भविष्यासाठी एआय-आधारित तपास प्रणाली, स्रोत नियोजन आणि बुद्धिमान पोलीस नेटवर्कची आवश्यकता भासू लागली आहे."

नीती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अमिताभ कांत म्हणाले, "भारताचे भावी नेतृत्व स्वच्छ ऊर्जा, पायाभूत सुविधा, डेटा-आधारित प्रशासन आणि मोठ्या प्रमाणावरील नवोन्मेषावर अवलंबून असेल. जी राष्ट्रे आज डिजिटल क्षमता आणि शाश्वत विकासात गुंतवणूक करतील, तेच उद्याच्या अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करतील."



*नीती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमिताभ कांत यांनी सादरीकरणाद्वारे डीप टेक, कृत्रिम बुद्धिमत्ता कौशल्यवृद्धी, डेटा सेंटर क्षेत्रातील महाराष्ट्राचे उदयोन्मुख नेतृत्व, स्वच्छ ऊर्जा तसेच विद्युत गतिशीलतेकडे होत असलेल्या संक्रमणाचे महत्त्व अधोरेखित केले.*

त्रिमूर्ती प्रांगणातील तंत्रज्ञान प्रात्यक्षिक, हे या उपक्रमाच्या पहिल्या दिवसाचे मुख्य आकर्षण ठरले. या सत्रात अत्याधुनिक नवकल्पना आणि उपाययोजना प्रदर्शित करण्यात आल्या, ज्यामुळे अधिकाऱ्यांना उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगांचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.



## डिजिटल विश्वास, नेतृत्व आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा

मंत्रालयात आयोजित टेक वारी 2.0 महाटेक लर्निंग वीकच्या दुसऱ्या दिवशी डिजिटल विश्वास, नेतृत्व, मानसिक आरोग्य आणि नागरिक केंद्रित सार्वजनिक पायाभूत सुविधा यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्याचबरोबर कायदा, प्रशासन, वित्त आणि संघटनात्मक विकास या क्षेत्रांतील तज्ज्ञांना एकत्र आणण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयातील वकील सुश्री खुशबू जैन यांच्या "डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण (डीपीडीपी) कायदा, 2023 आकलन, मुख्य तरतुदी आणि परिणाम" या विषयावरील माहितीपूर्ण सत्राने दिवसाची सुरुवात झाली. डेटा संरक्षण ही आता केवळ एक कायदेशीर आवश्यकता न राहता प्रशासकीय जबाबदारी झाली आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. आजच्या डिजिटल युगात गोपनीयतेचे वाढते महत्त्व अधोरेखित करताना त्या म्हणाल्या की डीपीडीपीची चौकट नागरिकांचा वैयक्तिक डेटा सुरक्षित राहील आणि त्याचा जबाबदारीने वापर केला जाईल, याची खातरजमा करताना, नवोन्मेष आणि जबाबदारी यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करते, असे त्या म्हणाल्या.




*टेक-वारी 2.0 मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या वकील ॲड. खुशबू जैन यांनी वैयक्तिक माहिती ही नागरिकांची मालमत्ता असून तिचे संरक्षण पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांच्या सूचित संमतीच्या आधारे केले गेले पाहिजे, यावर भर दिला. डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्हेगारी, फसवणूक आणि माहिती गळतीच्या धोक्यांवरही त्यांनी प्रकाश टाकला.*

मनशक्ती येथील कॉर्पोरेट ट्रेनर सुहास गुधाते यांनी तणाव

व्यवस्थापनासाठी आयोजित आरोग्य सत्राला संबोधित केले. कामाचा ताण जास्त असलेल्या प्रशासकीय वातावरणात भावनिक लवचिकता, मानसिक सुस्पष्टता, तसेच काम आणि वैयक्तिक जीवनात संतुलन राखण्यावर लक्ष केंद्रित करण्याबाबत मार्गदर्शन केले.

प्रभावी नेतृत्वासंदर्भातील सत्रात मिनोचर पटेल यांनी आधुनिक प्रशासनातील नेतृत्वाच्या बदलत्या भूमिकेवर प्रकाश टाकला. भविष्यासाठी सज्ज प्रशासकांनी संस्थात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी तांत्रिक ज्ञानासोबतच सहानुभूती, संवाद आणि निर्णयक्षमता यांचा मेळ घातला पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

नलिन बन्सल यांनी सादर केलेले “डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा: पेमेंट आणि सेवा” या सत्रालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. यूपीआय आणि एकात्मिक पेमेंट इकोसिस्टीमसह भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक समावेशन, डिजिटल व्यवहार आणि सेवा वितरणात परिवर्तन घडवून आणले आहे, आणि भारताचे युपीआय मॉडेल आता सर्वसमावेशक




*टेक-वारी 2.0 मध्ये एनपीसीआयचे मुख्य संबंध व्यवस्थापन – भागीदारी विभागाचे प्रमुख श्री. नलिन बन्सल यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा या प्रत्येक क्षेत्रासाठी अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित केले. यूपीआयसारख्या प्लॅटफॉर्ममुळे वित्तीय समावेशन, डिजिटल व्यवहार आणि भारताची वेगाने विकसित होत असलेली डिजिटल अर्थव्यवस्था अधिक सक्षम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.*



*जीवनातील धावपळ आणि तणावातून मुक्तता मिळवण्यासाठी संगीत ही ईश्वराने दिलेली सुंदर देणगी असून ते एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे, असे मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागातील प्राध्यापिका, लेखिका आणि गायिका डॉ. मृदुला दाढे यांनी सांगितले.*

डिजिटल प्रशासनासाठी एक जागतिक मापदंड म्हणून उदयास येत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

## महासारथी, इंडिया स्टॅक आणि क्वांटम एआय ड्राइव्ह

मंत्रालयात आयोजित टेक वारी 2.0 महा-टेक लर्निंग वीकच्या तिसऱ्या दिवशी डिजिटल प्रशासनाचे भविष्य, डेटा इकोसिस्टम आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान यावर लक्ष केंद्रित करण्यात आले, तसेच इंडिया स्टॅक, महासारथी आणि क्वांटम कंप्युटिंगवर माहितीपूर्ण सत्रे आयोजित करण्यात आली.

महासारथी या सत्राला संबोधित करताना इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव श्री वीरेंद्र सिंह म्हणाले की इंडिया स्टॅक आणि महासारथी सारखे उपक्रम अधिक एकात्मिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख शासन प्रणालीची



*“महा-सारथी पोर्टलमुळे शासकीय सेवांपर्यंतचा नागरिकांचा प्रवेश अधिक सुलभ, अखंड आणि नागरिकाभिमुख होत आहे,” असे माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव श्री. वीरेंद्र सिंह यांनी सांगितले.*

पायाभरणी करत आहेत. शासकीय डेटा अचूक, विश्वसनीय आणि विविध प्लॅटफॉर्मवर सुसंगत राहील याची खातरजमा करण्यासाठी विभागांनी डेटा मानकीकरणाची जबाबदारी घेतली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

नागरिक हे त्यांच्या डेटाचे खरे मालक आहेत, आणि डेटाची शुद्धता, सुरक्षा आणि अखंडता राखणे ही सरकारची मुख्य जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले. डिजिटल ओळख प्रणालीचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले की महाआयडीची निर्मिती विविध विभागांमध्ये शासकीय सेवांचा अखंड पुरवठा सक्षम करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. प्रशासकीय कार्यक्षमता आणि नागरिक सेवा सुधारण्यासाठी विभागांमध्ये डेटाचा प्रवाह अखंडपणे सुरू राहिला पाहिजे, तसेच गोपनीयता आणि संरक्षणासाठी भक्कम उपाययोजना सुनिश्चित केल्या पाहिजेत. डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण (डीपीडीपी) आराखड्याचा संदर्भ देत, नागरिकांचा डेटा सुरक्षित, संरक्षित आणि जबाबदारीने वापरला जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी या आराखड्याची पूर्णपणे अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन



*अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी.*

त्यांनी दिले.

वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री. विकास रस्तोगी सुद्धा या सत्रात सहभागी झाले. सेवा वितरण आणि प्रशासकीय कार्यक्षमता मजबूत करण्यासाठी कनेक्टेड डिजिटल गव्हर्नन्स प्लॅटफॉर्मच्या वाढत्या महत्त्वावर त्यांनी मार्गदर्शन केले.




'क्वांटम कंप्युटिंग – उपयोग, धोके आणि विकास' या विषयावरील सत्राला संबोधित करताना, आयबीएम रिसर्च इंडियाचे संचालक आणि आयबीएम इंडिया/दक्षिण आशियाचे एआय सीटीओ श्री. अमित सिंघी म्हणाले की क्वांटम कंप्युटिंग हे एक परिवर्तनकारक तंत्रज्ञान म्हणून उदयास येत आहे, जे पारंपरिक सुपरकॉम्प्युटरच्या आवाक्याबाहेरील अत्यंत गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यास सक्षम आहे.

क्वांटम कंप्युटिंगमध्ये लॉजिस्टिक्स, वित्त, ऊर्जा, आरोग्यसेवा, पदार्थ विज्ञान आणि कृषीसारख्या क्षेत्रांमध्ये क्रांती घडवून आणण्याची क्षमता आहे. आयबीएमच्या जागतिक वापराच्या उदाहरणांचा संदर्भ देत, एलएनजी शिपिंग मार्गांना अनुकूल करण्यासाठी, वित्तीय बाजारांमधील व्यापार अंमलबजावणी धोरणे सुधारण्यासाठी, बॅटरी रसायनशास्त्र संशोधनाला गती देण्यासाठी आणि शाश्वत शेतीसाठी ऊर्जा-सक्षम खते विकसित करण्यासाठी क्वांटम तंत्रज्ञानाचा शोध घेतला जात आहे, अशी माहिती त्यांनी दिली. क्वांटम कम्प्युटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्लासिकल कम्प्युटिंग यांच्या संगमामुळे मोठ्या प्रमाणावरील ऑप्टिमायझेशन आणि सिम्युलेशनची आव्हाने सोडवण्याच्या कामी मोठे यश मिळू शकते. विशेषतः हवामान बदल, स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत सामग्री संशोधन यांसारख्या क्षेत्रांचा त्यामध्ये प्रामुख्याने समावेश होतो, असे ते म्हणाले.

मात्र क्वांटम कंप्युटिंगमुळे सायबरसुरक्षेची गंभीर आव्हानेही निर्माण होतात, कारण भविष्यातील क्वांटम प्रणालींमुळे सध्याची एन्क्रिप्शन मानके आणि डिजिटल सुरक्षा चौकट कमकुवत होण्याची शक्यता आहे. असा इशाराही त्यांनी दिला. सरकार, उद्योग आणि शैक्षणिक संस्थांनी संशोधन, क्वांटम-सुरक्षित क्रिप्टोग्राफी, मनुष्यबळ विकास आणि स्वदेशी नवोन्मेष परिसंस्थांमध्ये गुंतवणूक करून क्वांटम-पश्चात युगासाठी तयारी करण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला.

उद्योग, शिक्षण संस्था, स्टार्टअप्स आणि सरकार यांनी एकत्रितपणे काम करून अंमलबजावणीसाठी सज्ज मनुष्यबळ, विस्तारक्षम अल्गोरिदम आणि व्यावहारिक एंटरप्राइझ ॲप्लिकेशन्स तयार केली, तर भारतामध्ये जागतिक क्वांटम तंत्रज्ञान केंद्र म्हणून उदयास येण्याची क्षमता आहे, असेही ते म्हणाले.

टेक वारी 2.0 च्या तिसऱ्या दिवशी, इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट टीमतर्फे पोषण आणि निरोगी जीवनशैली पद्धतींवर लक्ष केंद्रित करणारे "फूड फॉर थॉट" नावाचे सत्र आयोजित करण्यात आले. त्यानंतर सुश्री हंसाजी यांनी "योगरंग - निरोगी जीवनासाठी योग" हा कार्यक्रम सादर केला. मुंबईतील योग संस्थेचे संचालक योगेंद्र यांनी प्रशासकीय कार्यक्षमतेसाठी आरोग्य आणि संतुलित जीवनशैलीच्या महत्त्वावर भर दिले.

नैतिक प्रशासनापासून ते जनरेटिव्ह एआयपर्यंत: टेक वारी 2.0 उपक्रम प्रशासनाच्या भविष्याचा वेध घेणारा ठरला.

मंत्रालयात आयोजित टेकवारी 2.0 महाटेक लर्निंग वीकच्या चौथ्या दिवशी प्रशासनातील नैतिकता, सायबर सुरक्षेचे धोके, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान, सर्जनशीलता व सार्वजनिक प्रशासन यांच्यातील वाढता समन्वय या विषयावर महत्वपूर्ण चर्चा आयोजित करण्यात आली.

मोरल री-आर्ममेंट (एमआरए) पाचगणी आणि यशदामधील व्याख्याते श्री. प्रभाकर वर्तक यांच्या "प्रशासनातील नीतिमत्ता" या विषयावरील माहितीपूर्ण व्याख्यानाने या सत्राची सुरुवात झाली. शासकीय अधिकाऱ्यांना संबोधित करताना शासन म्हणजे केवळ प्रशासकीय कार्यक्षमता नव्हे, तर सचोटी, उत्तरदायित्व आणि नैतिक नेतृत्व देखील आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

ते म्हणाले, "शासनातील नीतिमत्ता म्हणजे केवळ नियमांचे पालन करणे नव्हे; तर ती लोकसेवेची नैतिक जबाबदारी आहे. सुशासन उत्तरदायी, पारदर्शक, सर्वसमावेशक आणि कायद्याच्या राज्यावर आधारित असले पाहिजे. नैतिक शासनाचा अर्थ म्हणजे कायद्याने आवश्यक असलेल्या गोष्टींपेक्षा जास्त काम करणे आणि अधिकाराने परवानगी दिलेल्या गोष्टींपेक्षा कमी घेणे, असे ते म्हणाले.

भ्रष्टाचाराचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम अधोरेखित करताना, नागरिक आणि संस्था यांच्यात विश्वास निर्माण करण्यासाठी प्रामाणिकपणा, निःस्वार्थता, करुणा आणि लोकसेवा यांसारखी मूल्ये आवश्यक आहेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

डीजीआयपीआरचे सचिव श्री. ब्रिजेश सिंह यांनी 'सायबर सुरक्षेचे बदलणारे स्वरूप - धोके, आव्हाने आणि संधी' या विषयावरील दुसऱ्या सत्राला संबोधित केले. सायबर फसवणूक, रॅन्समवेअर हल्ले, माहितीचा गैरवापर आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांना असलेले धोके यांसारख्या सायबर धोक्यांच्या झपाट्याने बदलणाऱ्या स्वरूपावर त्यांनी प्रकाश टाकला. वाढत्या डिजिटल वापरामुळे सायबर सुरक्षा ही राष्ट्रीय प्रशासनाची प्राथमिकता बनली आहे, यावर त्यांनी भर दिला. डिजिटल परिसंस्था आणि नागरिकांचा डेटा सुरक्षित करण्यासाठी सायबर जागरूकता, संस्थात्मक सज्जता, आंतर-संस्थात्मक समन्वय आणि प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले.



*श्री एम. चोक्कलिंगम, संचालक – फ्रंटियर टेक्नॉलॉजी, नॅसकॉम यांनी टेक-वारी 2.0 अंतर्गत जनरेटिव्ह कृत्रिम बुद्धिमत्ता (Generative AI) या विषयावर प्रात्यक्षिक सत्र आयोजित केले. या सत्रामध्ये त्यांनी चॅटजीपीटी (ChatGPT) आणि जेमिनी (Gemini) यांसारख्या कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित साधनांचा शासन व्यवस्था तसेच नागरिक सेवा क्षेत्रातील उपयोग अधोरेखित केला.*

नॅसकॉमचे फ्रंटियर टेक्नॉलॉजी संचालक श्री. एम. चोकलिंगम यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित एक प्रात्यक्षिक सत्र घेतले. या सत्रात अधिकाऱ्यांना प्रशासन, कार्यप्रवाह स्वयंचलन, नागरिक सेवा, दळणवळण आणि निर्णय सहाय्य प्रणाली या क्षेत्रांमधील जनरेटिव्ह एआयच्या उदयोन्मुख उपयोगांची ओळख करून देण्यात आली. एआयचा वापर करून डेटा-आधारित सार्वजनिक प्रशासनात कसे परिवर्तन घडू शकते, हे त्यांनी दाखवून दिले. जबाबदार आणि नैतिक एआय अवलंबनाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

एनजीएमएच्या संचालक निधी चौधरी यांनी सूत्रसंचालन केलेल्या 'कलारंग – कला, एआय आणि प्रशासन' या अनोख्या चर्चेने दिवसाची सांगता झाली. या चर्चेत काळा घोडा कला महोत्सवाच्या संस्थापिका सुश्री वृंदा मिलर, शिल्पकार श्री. अर्झान खंबाटा, चित्रपट दिग्दर्शक



*टेक-वारी 2.0 अंतर्गत "कलारंग : कला, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुशासन" या विषयावर विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला. यामध्ये कलाकार आणि चित्रपट निर्मात्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक प्रभावी साधन असले तरी मानवी भावना, सर्जनशीलता आणि संवेदनशीलता यांची जागा ती कधीही घेऊ शकत नाही, यावर भर दिला.*

श्री. रोहन सिप्पी आणि श्री. अशोक कौल असे नामवंत सहभागी झाले. डिजिटल युगात कला, चित्रपट आणि कृत्रिम बुद्धिमत्ता संस्कृती, सार्वजनिक विचारप्रणाली आणि प्रशासकीय संवाद यांना कसे आकार देत आहेत, याबाबत या सत्रात चर्चा करण्यात आली. सहभागी मान्यवरांनी, तांत्रिक नवोपक्रम आणि सर्जनशीलता, मानवी मूल्ये आणि सांस्कृतिक ओळख यांच्यात संतुलन राखण्याच्या गरजेवर भर दिला.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित, नागरिक-केंद्रित आणि भविष्य-सज्ज प्रशासनासाठी परिवर्तनकारक चळवळ असे स्वरूप असणाऱ्या या टेक वारी 2.0 उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाने महाराष्ट्राच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांना तंत्रज्ञान, नैतिकता, नवोपक्रम, नेतृत्व आणि निरंतर प्रशिक्षणाद्वारे सक्षम करून 2047 सालापर्यंत सर्वसमावेशक महाराष्ट्र घडवण्याची वचनबद्धता अधोरेखित केली.

# डिजिटल शासनासाठी सामुदायिक क्षमता निर्माण



## नाशिक येथे MahaIT–YCMOU प्रशिक्षकांचे प्रशिक्षण

नागरिक त्यांच्या दैनंदिन जीवनात डिजिटल स्वरूपातील सेवा समजून घेण्यास, त्यांवर विश्वास ठेवण्यास आणि त्या वापरण्यास सक्षम असतात, तेव्हाच डिजिटल शासन अर्थपूर्ण ठरते. तंत्रज्ञानाधारित मंच सार्वजनिक सेवा प्रदान करण्याची प्रक्रिया अधिक जलद आणि सुलभ करू शकतात, मात्र असे मंच नागरिकांना कशा प्रकारे मार्गदर्शन करतात आणि अडचणींमध्ये त्यांना कशा प्रकारे साहाय्य करतात, यावर त्यांचे यश अवलंबून असते.

हेच लक्षात घेत, **महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ अर्थात महाआयटी'तर्फे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सहकार्याने 7 आणि 8 मे 2026 रोजी नाशिक** येथे विद्यापीठाच्या मुख्यालयात, प्रशिक्षकांसाठी **दोन दिवसांचे प्रशिक्षण** आयोजित करण्यात आले.

**महाआयडी** आणि **महासारथी**'सारख्या उपक्रमांशी संबंधित माहिती, शिक्षण आणि संप्रेषण प्रयत्नांचा भाग म्हणून या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. डिजिटल शासकीय उपक्रमांच्या व्यापक सामुदायिक स्वीकृतीसाठी प्रशिक्षक परिसंस्था निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## सामुदायिक स्वीकृतीची आवश्यकता

शासकीय सेवा दिवसेंदिवस डिजिटल स्वरूपाच्या होत आहेत. या सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी ऑनलाइन मंच, डिजिटल ओळख प्रणाली, सेवा पोर्टल, सहाय्यक प्रवेश केंद्रे आणि मोबाइल-आधारित माहिती स्रोतांचा वापर करणे अपेक्षित आहे. डिजिटल स्वरूपातील या प्रणाली सेवा प्रदान प्रक्रियेतील विलंब कमी करू शकतात, पारदर्शकता वाढवू शकतात आणि सेवा प्रदान करणे जास्त सुलभ करू शकतात.

मात्र डिजिटल स्वरूपातील सेवा नागरिक आपोआप स्वीकारत नाहीत.

डिजिटल मंच कशा प्रकारे काम करतो, त्याचे स्वरूप काय आहे, तो कसा उपयुक्त आहे, तो अधिकृत आहे का, त्याद्वारे आपल्याला कोणत्या सेवेचा लाभ घेता येईल, कोणते दस्तऐवज आवश्यक आहेत आणि अडचण आल्यावर कुठे जावे, अशा अनेक प्रश्नांची उत्तरे प्राप्त करण्यासाठी नागरिकांना मदतीची आवश्यकता भासते. डिजिटल शासन हा केवळ स्वयंसेवा-आधारित प्रवास नाही, तर तो परस्पर-सहाय्यक प्रवास आहे.

अशा वेळी व्हीएलई, नागरिकांच्या थेट संपर्कात येणारे शासकीय कर्मचारी, जिल्हा संघ, स्थानिक सुविधादाते आणि प्रशिक्षित समुदाय हे घटक महत्त्वाचे ठरतात. शासकीय डिजिटल मंच आणि नागरिक यांच्यातील सेतू म्हणून ते काम करतात.

## प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाचा उद्देश

व्हीएलई, नागरिकांच्या थेट संपर्कात येणारे शासकीय कर्मचारी, आणि स्थानिक सुविधादात्यांना डिजिटल मंचाद्वारे सेवा प्रदान करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे, हा या प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश होता.

हा उपक्रम केवळ प्रात्यक्षिकापुरता मर्यादित नव्हता. शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थींना देण्याच्या कामी उपयुक्त ठरतील, असे प्रशिक्षक घडविण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा हा उपक्रम होता.

या उपक्रमांतर्गत प्रशिक्षकांना खालील गोष्टींसाठी तयार करणे अपेक्षित होते:

- डिजिटल शासकीय उपक्रम सोप्या भाषेत स्पष्ट करणे
- प्रवेश बिंदू आणि मूलभूत प्रक्रियांद्वारे नागरिकांना मार्गदर्शन करणे
- संबंधित सेवा आणि योजना ओळखण्यात नागरिकांना मदत करणे
- अधिकृत डिजिटल प्रणालींवर विश्वास निर्माण करणे
- सर्वसाधारण शंका आणि अपयशाचे मुद्दे निकाली काढणे, आणि
- एक-वेळ नोंदणीपलीकडे जात, शासकीय मंचाच्या अर्थपूर्ण

वापरास प्रोत्साहित करणे.

## कार्यक्रमाचा भर

प्रशिक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी डिजिटल शासन आणि नागरिकांचे सक्षमीकरण या मुद्द्यांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. डिजिटल शासनाचे महत्त्व, नागरिकांसमोर असणारी आव्हाने, आणि सामुदायिक स्वीकृतीसाठी निव्वळ जनजागृतीपलीकडे आवश्यक असणाऱ्या प्रयत्नांबाबत यावेळी उपस्थितांनी चर्चा केली.

यावेळी आयोजित सत्रांमध्ये डिजिटल मंचांची मर्यादा, भाषेची अडचण, दस्तऐवज-संबंधी आव्हाने, आत्मविश्वासाचा अभाव आणि विश्वसनीय स्थानिक आधाराची गरज असे महत्वाचे मुद्देही विचारात घेण्यात आले.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी, महाआयडी आणि महासारथी'सारख्या उपक्रमांना समुदाय स्तरावर कशा प्रकारे स्पष्ट करावे, याबाबत प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. माहिती, शिक्षण आणि संप्रेषण प्रयत्नांना क्षेत्रीय सहभागाची जोड कशा प्रकारे देता येईल, याबाबतही उपस्थितांनी वैचारिक देवाण-घेवाण केली.

महाआयडी हा महाराष्ट्रातील नागरिकांसाठी एकीकृत डिजिटल ओळख मिळवून देणारा मंच आहे, जो नागरिकांना त्यांची सत्यापित ओळख प्रदान करतो, तसेच शासकीय सेवा आणि कल्याणकारी योजनांचे लाभ प्राप्त करण्याचा मार्ग प्रशस्त करतो. महासारथी हे एकीकृत सेवा वितरण पोर्टल आहे, जे अनेक शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देते, तसेच नागरिकांना आवश्यक प्रमाणपत्रे, योजना आणि लाभांसाठी अर्ज करण्याची अनुमती देते. हे उपक्रम महाराष्ट्राच्या तळागाळातील नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक पद्धतीने शासकीय लाभ प्रदान करण्याप्रति वचनबद्धता दर्शवितात.

या उपक्रमांच्या संदर्भात माहिती, शिक्षण आणि संप्रेषण प्रयत्न केवळ संदेश वितरणावर थांबू नयेत, या प्रयत्नांच्या माध्यमातून नागरिकांना जागरूकतेपासून समजापर्यंत, समजापासून विश्वासापर्यंत आणि विश्वासापासून प्रत्यक्ष वापरापर्यंत नेण्यास मदत केली पाहिजे, यावर उपस्थितांनी भर दिला.

## संमिश्र सहभागींचे सहभाग

राज्यातील नागरिकांना सेवा प्रदान करणारे केंद्र चालक, जिल्हा समन्वयक आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील समन्वयक अशा संमिश्र घटकांचा सहभाग, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

या आयोजनामुळे हा प्रशिक्षकांचे प्रशिक्षण उपक्रम अधिक व्यावहारिक आणि उपयुक्त ठरला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अकादमिक समन्वयकांनी अध्यापन, सुलभीकरण, शिकणाऱ्यांचा सहभाग आणि संरचित प्रशिक्षणाचा अनुभव प्रदान केला. जिल्हा समन्वयकांनी जिल्हा-स्तरीय अंमलबजावणी, समन्वय, अहवाल आणि प्रशासकीय वास्तवाबाबत भाष्य केले, तर व्हीएलईंनी नागरिकांसोबत काम करण्याचा, सेवा विनंत्या हाताळण्याचा, शासकीय सेवा आणि लाभ समजावून सांगण्याचा, शंका-निरसन करण्याचा, दस्तऐवज, ओटीपी, कनेक्टिव्हिटी आणि पाठपुरावा अशा व्यावहारिक समस्यांना सामोरे जाण्याचा थेट अनुभव कथन केला आणि वास्तविक प्रश्नांबाबत चर्चा केली.

प्रशिक्षण म्हणजे शिकणे आणि शिकवणेया समजाला छेद देत, या उपक्रमात सहभागी झालेल्या विविध भागधारकांचे अनुभव आणि प्रत्यक्ष समस्यांबाबत चर्चा झाल्यामुळे या प्रशिक्षणाचे स्वरूप संवादी राहिले, त्यामुळे ते जास्त परिणामकारक आणि प्रभावी ठरले. डिजिटल मंचावरून शासकीय सेवा प्रदान करताना नागरिकांच्या सक्षमीकरणाचा मुद्दाही सातत्याने अधोरेखित झाल्यामुळे तळागाळापर्यंत जनजागृती करण्याचे उद्दिष्टही साध्य करता आले.

सेवा केंद्र परिचालकांच्या वास्तविक अनुभव कथनामुळे अकादमिक समन्वयकांना नागरिकांना असलेल्या शंकांचे, आणि व्यावहारिक अडचणींचे स्वरूप समजण्यास मदत झाली. योग्य प्रशिक्षण पद्धती आणि सुलभीकरणाच्या माध्यमातून एकंदर प्रक्रियेमध्ये शिस्त आणण्यास उपयुक्त ठरणाऱ्या सूचना अकादमिक समन्वयकांनी केल्या.

## प्रशिक्षण, समन्वय आणि तळागाळापर्यंत पोहोच

प्रशिक्षण देणारे, समन्वय साधणारे आणि नागरिकांना थेट सहाय्य करणारे, असे तीन मुख्य घटक या उपक्रमाच्या माध्यमातून एका मंचावर आले.

कालसुसंगत बदल स्वीकारताना आणि प्रगतीसाठी तंत्रज्ञानाची कास धरताना सुस्पष्ट संवाद, जिल्हा-स्तरीय समन्वय, स्थानिकांचा विश्वास आणि प्रशिक्षित सेवा प्रदाते हे सर्व घटक महत्वाचे ठरतात, हे या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अकादमिक समन्वयक, जिल्हा समन्वयक आणि सेवा केंद्र परिचालक यांच्यातील संवादामुळे हा उपक्रम खऱ्या अर्थाने यशस्वी ठरला. प्रशिक्षकाने केवळ विषय स्पष्ट करणे पुरेसे नसते, तर प्रक्रियेत सहभागी घटकांना नागरिकांशी संवाद साधण्यासाठी, संयमाने शंका-निरसन करण्यासाठी, आवश्यक तेव्हा आधार देण्यासाठी आणि अचूक वापरास प्रोत्साहित करण्यासाठी सज्ज करणेही महत्वाचे असते, हे या उपक्रमातून लक्षात आले.

## माहिती, शिक्षण आणि संप्रेषणापासून अर्थपूर्ण वापरापर्यंत

माहिती, शिक्षण आणि संप्रेषणाच्या माध्यमातून स्वीकृतीच्या दिशेने

प्रवास झाला पाहिजे, हा महत्वाचा संदेश या उपक्रमाने दिला. भित्तीपत्रके, संदेश, मोहिमा आणि घोषणांच्या माध्यमातून जनजागृती होऊ शकते, मात्र नागरिक प्रत्यक्षात एखादी सेवा समजून घेतात आणि वापरतात तेव्हाच परिवर्तनाचा स्वीकार झाला, असे आपण म्हणू शकतो.

आपल्याला हव्या असलेल्या सेवा नागरितांना शोधता येतात, त्या प्राप्त करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया ते पूर्ण करू शकतात, गरज भासेल तिथे मदत घेऊ शकतात आणि संपूर्ण आत्मविश्वासाने प्रक्रिया पूर्ण करू शकतात, तेव्हा ती प्रणाली योग्य पद्धतीने काम करते, असे म्हणता येते.
यासाठी, ग्रामस्तरीय उद्योजक आणि आघाडीच्या फळीतील शासकीय कर्मचाऱ्यांना केवळ परिचालक म्हणून नव्हे तर मार्गदर्शक, विश्वास-निर्माते, समस्या-सोडवणारे आणि सामुदायिक संघटक म्हणून तयार करणे आवश्यक आहे.

## लोकाभिमुख डिजिटल प्रशासनाच्या दिशेने एक पाऊल

नाशिक येथीलनाशिक येथे आयोजित महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ अर्थात महाआयटी'तर्फे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित प्रशिक्षण हे डिजिटल प्रशासनाच्या स्वीकृतीसाठी आवश्यक असलेले सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरले.

या उपक्रमाच्या माध्यमातून शासकीय सेवा प्रदान करणाऱ्या मनुष्यबळाच्या आकलन क्षमतेत वाढ करण्याबरोबरच तळागाळातील नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण उपयुक्त ठरल्याचे दिसून आले.

भविष्यात अशा प्रकारचे डिजिटल शासकीय उपक्रम विस्तारत राहणार आहेत, हे वास्तव लक्षात घेता, हे उपक्रम प्रणाली आणि कार्यालयांपुरते मर्यादित न राहता समुदाय, घरे आणि प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचतील, याची खातरजमा करण्यासाठी असे प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने राबविण्याची गरजही या निमित्ताने अधोरेखित झाली.

प्रत्येक नागरिकासाठी डिजिटल प्रशासन अधिक आकलनीय, सुलभ, विश्वासार्ह आणि उपयुक्त बनवणे, हा यामागचा सर्वात महत्वाचा उद्देश आहे.



# टेकमहाइम्पॅक्ट 2026



## तंत्रज्ञान, सामाजिक उत्तरदायित्व आणि सुशासनाच्या संगमाद्वारे महाराष्ट्राच्या डिजिटल भवितव्याला नवी दिशा

महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने (महाआयटी), 'एलीट्स टेक्नोमिडिया' यांच्या सहकार्याने मुंबई येथे 'टेकमहाइम्पॅक्ट 2026' या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय सामाजिक उत्तरदायित्व परिषदचे भव्य आयोजन केले. राज्याच्या डिजिटल परिवर्तनाला गती देणे, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लोकाभिमुख सेवा अधिक सक्षम करणे आणि सामाजिक क्षेत्राला शासनाच्या विकासात्मक उपक्रमांशी प्रभावीपणे जोडणे, हा या परिषदेचा मुख्य उद्देश होता.

महाराष्ट्राच्या डिजिटल भवितव्याचा वेध महाराष्ट्राच्या डिजिटल भवितव्याचा वेध घेणाऱ्या या परिषदेत शासन, उद्योग, तंत्रज्ञान आणि सामाजिक दायीत्व क्षेत्रातील राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर एकाच मंचावर एकत्र आले. कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-प्रशासन, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ग्रामीण डिजिटल समावेशन, आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास आणि तळागाळापर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर या विषयांवर विविध सत्रांमध्ये सखोल चर्चा झाली.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे मंत्री श्री. आशिष शेलार, मुख्य सचिव श्री. राजेश अग्रवाल, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या आयुक्त श्रीमती भुवनेश्वरी एस., महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय काटकर , मुख्य परिचालन अधिकारी श्री. भगवान पाटील यांच्यासह शासनाच्या विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी, उद्योग प्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

परिषदेतील सर्वच सत्रांमध्ये महाराष्ट्राच्या डिजिटल विकासाविषयी ऊर्जा आणि आशावाद दिसून आला. राज्य शासन प्रशासनाबरोबरच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी तंत्रज्ञानाचा वापर जोडण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे, या परिषदेतून स्पष्टपणे दिसून आले.

या परिषदेत राज्यातील विविध डिजिटल आणि सामाजिक उपक्रमांसाठी सुमारे 155.75 कोटी रुपये मूल्याच्या 24 सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारांच्या माध्यमातून राज्यात आर्थिक गुंतवणूक होते आहे, आणि त्याचबरोबर यानिमित्ताने शासन, उद्योग आणि सामाजिक क्षेत्र एकत्र येऊन महाराष्ट्राच्या सामाजिक आणि डिजिटल विकासासाठी सामूहिक बांधिलकीतून एकत्र आले आहेत. राज्यातील ग्रामीण आणि वंचित भागांमध्ये डिजिटल सुविधा, आरोग्य सेवा, शिक्षण, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाधारित सार्वजनिक सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी या भागीदारींचा मोठा उपयोग होणार आहे.

या परिषदेत 'महासारथी' आणि 'आपले सरकार' या महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वपूर्ण डिजिटल उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला. शासनाच्या विविध सेवा नागरिकांना अधिक पारदर्शक, सुलभ, वेगवान आणि एकाच डिजिटल मंचावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन करत असलेल्या प्रयत्नांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. 'वन सिटीझन-वन डिजिटल आयडेंटिटी' या संकल्पनेवर आधारित महासारथी उपक्रमामुळे भविष्यात नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळण्यास मदत होणार असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये डिजिटल सेवा पोहोचवण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्र आणि आपले सेवा केंद्र चालक यांच्या नेटवर्कची भूमिका, या परिषदेत विशेष चर्चेचा विषय ठरली. राज्यातील लाखो नागरिकांना शासकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध करून देण्यात या नेटवर्कचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद करण्यात आले. डिजिटल साक्षरता, कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित सेवा, डिजिटल आरोग्य सुविधा, टेलिमेडिसिन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, शिष्यवृत्ती, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित शिक्षण, आणि युवकांसाठी कौशल्य विकास यांसारख्या विषयांवर विविध तज्ज्ञांनी आपले विचार मांडले.

परिषदेतील पहिल्या चर्चासत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-प्रशासन आणि

डिजिटल नवोन्मेषाच्या साहाय्याने महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अधिक सक्षम आणि गतिमान कशी करता येईल, यावर चर्चा झाली. शासन आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी डेटा, तंत्रज्ञान आणि डिजिटल मंचाच्या साहाय्याने प्रशासन अधिक परिणामकारक करण्याच्या संधी स्पष्ट केल्या.

‘समृद्ध महाराष्ट्र’ या सत्रात शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार निर्मितीसाठी सामाजिक दायीत्व निधीचा अधिक प्रभावी वापर कसा करता येईल, यावर विचारमंथन झाले. आकांक्षी जिल्ह्यांमध्ये तंत्रज्ञान आणि सामाजिक संस्थाच्या साहाय्याने परिवर्तन घडवून आणण्यासाठी विविध मॉडेल्सही सादर करण्यात आली. आरोग्य क्षेत्रावर आधारित ‘स्वस्थ महाराष्ट्र’ सत्रात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापन, डिजिटल हेल्थकेअर आणि तंत्रज्ञानाधारित आरोग्य सेवा यावर चर्चा झाली.

भौगोलिक माहिती प्रणाली - जीआयएस, डेटा ॲनालिटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित निर्णय प्रक्रियेच्या माध्यमातून डिजिटल प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी विविध तंत्रज्ञान कंपन्यांनी उपाययोजना आणि अनुभव सादर केले. तंत्रज्ञान हे आता प्रशासनाच्या केंद्रस्थानी पोहोचले आहे, हे या सत्रांमधून अधोरेखित झाले.

उद्घाटनपर भाषणात मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी, महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक सामाजिक उत्तरदायीत्व निधी उभे करणारे राज्य असल्याचे सांगितले. हा निधी समाजाच्या तळागाळापर्यंत परिणामकारकरीत्या पोहोचवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तंत्रज्ञान, नवकल्पना आणि सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून राज्यात व्यापक सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे मा. मंत्री श्री. आशिष शेलार यांनी आपल्या भाषणात सांगितले की टेकमहाइम्पॅक्ट 2026 ही परिषद महाराष्ट्राच्या समावेशक, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशासनाच्या दृष्टीकोनाचे प्रतीक आहे. शासन, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रातील सहकार्यामुळे नागरिकांपर्यंत डिजिटल सेवा अधिक वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचतील. महासारथी आणि आपले सरकार यांसारख्या उपक्रमांमुळे महाराष्ट्र अधिक सक्षम डिजिटल परिसंस्था उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असे ते म्हणाले.

विकसित महाराष्ट्र 2047’ या राज्य शासनाच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेला बळ देणारी ही परिषद महाराष्ट्राच्या डिजिटल भवितव्याचा महत्त्वपूर्ण पाया ठरली. तंत्रज्ञान, सामाजिक उत्तरदायित्व आणि सुशासन यांची प्रभावी सांगड घालत लोकाभिमुख विकासाचा नवा मार्ग या परिषदेतून अधोरेखित झाला. महाराष्ट्र केवळ डिजिटल परिवर्तनात सहभागी नसून देशाला दिशा देणारे नेतृत्व करणारे राज्य म्हणून पुढे येत असल्याचा स्पष्ट संदेश ‘टेकमहाइम्पॅक्ट 2026’मधून देण्यात आला.



## योगदान:

**मजकूर योगदान:**
धीरेंद्र सिंग

**संपादन:**
माधुरी पांगे

**तपशील समन्वय, संकलन आणि यशोगाथा:**
प्रज्योत आयरे आणि जिल्हास्तरीय सहकारी
रवींद्र गांगुर्डे
पृथ्वीराज हणमंतराव बिरादार

**रचना, सजावट:**
हर्षवर्धन बगाडे
सूर्यकांत उभे

**योगदान:**
माधुरी पांगे
दिशा खातू
सुभाष शेळके
नरेश इंगळे
मुकेश शर्मा


### आम्हाला फॉलो करा

@MahaIT
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
@Aaple_Sarkarr
आपले सरकार


### प्रकाशक

MahaIT
IMAGINE. INVENT. INSPIRE

अपीजे हाउस, तिसरा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के. सी. कॉलेज जवळ,
चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र 400020

**ई-मेल:** editor@mahait.org
**संकेतस्थळ:** https://mahait.org